गुंतवणूकदारांसाठी सुवर्ण संधी
महावीर पेन्शन ठेव योजना
1 लाख रुपये गुंतवणुक एक वर्षासाठी करा व मिळवा
दरमहा 833/- रुपये व्याज
दि जैन मर्चन्टस् को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.
इमारत कंपनी, पोस्ट ऑफिस जवळ, कापड बाजार, अ.नगर. फोन नं. : 0241-2993900
श्री. संजय काटेड (संस्थापक) Mo. 9372444001

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

सुवर्ण विश्वातील सर्वात जूनी..
विश्वसनीय व नामांकित पेढी...
मे. हरी बाकाजी देडगांवकर
Since 1935
सराफ अॅण्ड ज्वेलर्स
२५७१, एम.जी.रोड, कापड बाजार, अहमदनगर.
फोन : २३४६४४३. मो. ९८२२९९१०२४.

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शनिवार दि. २४.०५.२०२५ | अंक नं. ४६ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

फक्त फायदाच फायदा!
खरेदीवर पॉइंट पॉइंटसवर गिफ्ट
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

चांदीच्या अप्रतिम असंख्य डिझाईन्स व चांदीचा दर शुध्दतेनुसार
चांदीच्या 92.5 शुध्दतेमधील सर्व प्रकारच्या मुर्ती, मिकी माऊस, ग्लास, प्लेट, वाटी, चमचा, सोबतच मंगळसूत्र, चैन, अंगठी, कडे, टॉप्स, पायल, स्टर्लिंग ज्वेलरीची भव्य श्रेणी.
चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
22 कॅरेट सोन्याचा सर्वात कमी दर
दागिन्यांच्या मजुरीवर 20% पर्यंत सूट
हुशी, कुंदन ज्वेलरीच्या मजुरीवर 50% पर्यंत सूट
आपला जुना दागिना एक्स्चेंज करा आणि मिळवा 100% किंमतीचा परतावा

# नगर शहरातील नागरिक सध्या अक्षरशः 'नरक यातना' भोगत असताना निवडणुकीच्यावेळी जनतेचा अतिशय कळवळा भासवणारे सगळे गेले कुठे?

### संतप्त नागरिकांचा सवाल

नगर - इतिहासात आपल्या ऐतिहासिक नगर शहराची तुलना अनेक शहरांशी केली गेली. मात्र आज आपल्या शहरांमधील व जिल्ह्यातील गचाळ राजकारणामुळे नगरला धोबीपछाड देत अनेक शहरांनी आपला विकास साधत आपल्या शहराची एक वेगळी ओळख निर्माण केली.नाशिक, छत्रपती संभाजीनगर अशा अनेक शहरांचा औद्योगिकरणामुळे कसा कायापालट झाला आहे हे आपण पाहत आहोत. तेथील राजकारणही त्याला पोषक असे वातावरण देत आहेत. अशी आपल्या शहराची परिस्थिती नाही, इथे प्रत्येक जण आपापली राजकीय पोळी भाजण्यात व्यस्त दिसत आहे त्यांना आपल्या जनतेचे काहीही देणे-घेणे नाही. त्यामुळे हळूहळू नगर शहराची ओळख एक मोठं खेडं अशी झालेली आहे. ती काही बदलताना दिसत नाही. अशी खंत शहरातील हतबल झालेले सर्वसामान्य नागरिक व्यक्त करत आहेत. तसेच निवडणूक आली की जनतेचा कळवळा घेणारे सर्वच पक्षातील आजी माजी पदाधिकारी, कार्यकर्ते कोणत्या बिळात जावून

(पुढील मजकूर व छायाचित्र पान २ वर)

### जनतेला कोणीच वाली राहिला नाही

महापालिकेच्या सदस्यांची मुदत संपल्यामुळे आणि निवडणूक रखडल्यामुळे सध्या प्रशासक राज चालू आहे. कोणत्याच भागाला कोणी वाली नाही, विरोधक तर कोणाच्या धाक दपटशाही खाली राहत आहे ते कळायला मार्ग नाही. ना आंदोलन ना जाब विचारायला कुणी महापालिकेकडे जात आहे हेही दिसत नाही. कोणी अंकुश ठेवायलाच नाही म्हटल्यावर ठेकेदारांना ही वर्क ऑर्डर निघताच पावसाला एवढा जोर नव्हता तेवढी रस्ते खोदून ठेवायला यांना जोर आला होता. नगरमध्ये कोठेही जा कोणत्याही गल्लीतून बोळातून गेले तरी आपल्या मनपाच्या ठेकेदार महाशयांनी प्रत्येक रस्ता खोदून ठेवला आहे. लोकांना पायी चालणे ही मुश्किल झाले आहे. आपल्या घरापर्यंत जायला त्यांना रस्ता नाही. कुठून तरी मोठी कसरत करत मार्ग काढत घरापर्यंत जावं लागत आहे.

### आयुक्तांनी प्रत्येक कामाच्या ठिकाणी माहिती फलक लावावा

गेल्या काही दिवसांपासून नगरला अवकाळी पाऊस झोडपत आहे. त्यामुळे सध्या शहराची काय अवस्था झाली आहे, ती प्रत्येक नगरकर अनुभवत आहे. प्रत्येक ठिकाणी खोदून ठेवलेल्या रस्त्याला तळ्यासारखे रूप प्राप्त झाले आहे. आता तर या खड्ड्यात नगरकरांचा जीव जाण्याचा बाकी राहिलाय. कोणत्या ठेकेदाराने रस्त्याचा ठेका घेतला आहे तो ठेप्यावर नाही. आता महापालिका आयुक्तांनीच एक बोर्ड लावून रस्त्याचे काम कोणाला दिले, किती दिवसात पूर्ण होणार, त्यात ठेकेदाराचा नंबर किंवा प्रशासनातील अधिकाऱ्याचा नंबर त्या बोर्डवर नमूद करावा म्हणजे नगरकर गाडी फसल्यानंतर थोडा रागाच्या भरात निदान आपणाला किंवा त्या ठेकेदाराला जाब विचारेल, किंवा कुणा सर्वसामान्याला इजा झाली किंवा गंभीर दुखापत झाली किंवा जीव गेला तर निदान त्या ठेकेदारावर वेळेत काम न केल्यामुळे सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात थोडी मदत तर होईल. त्यामुळे तेवढा कामाच्या ठिकाणी एक फलक तरी लावा ?कारण या नगरकरांना प्रशासक राज चालू असल्यामुळे कोणाला जाब विचारावा हेच कळायला मार्ग राहिला नाही.

# मान्सून केरळमध्ये दाखल

## १६ वर्षांत सर्वात लवकर; २८ राज्यांत वादळ-पाऊस आणि उष्णतेचा रेड अलर्ट

नवी दिल्ली - मान्सून केरळमध्ये दाखल झाला आहे. तो १ जून या त्याच्या नियोजित वेळेच्या ८ दिवस आधी २४ मे रोजी केरळमध्ये पोहोचला आहे. हवामान खात्याच्या माहितीनुसार, १६ वर्षांत पहिल्यांदाच मान्सून इतक्या लवकर पोहोचला आहे. २०२४ मध्ये तो ३० मे रोजी केरळमध्ये पोहोचला होता.

मान्सून देशापासून सुमारे ४०-५० किलोमीटर अंतरावर चार दिवस अडकला होता आणि २३ मे रोजी संध्याकाळी पुढे सरकला. २४ मे रोजी तो तामिळनाडू आणि कर्नाटकच्या अनेक भागात पोहोचण्याची अपेक्षा आहे. त्याच वेळी, तो एका आठवड्यात देशाच्या दक्षिण आणि ईशान्य राज्यांना व्यापू शकतो. तो ४ जूनपर्यंत मध्य आणि पूर्व भारतात पोहोचेल. याशिवाय, हवामान विभागाने दोन प्रकारचे रेड अलर्ट जारी केले आहेत. पहिला मुसळधार पावसाचा आणि दुसरा अति उष्णतेचा. गुजरात, गोवा, महाराष्ट्र, कर्नाटक आणि केरळच्या किनारी भागात २०० मिमी पर्यंत पाऊस पडू शकतो. पुढील सात दिवस या राज्यांमध्ये मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

तसेच, देशातील एकूण २९ राज्यांमध्ये वादळ आणि पावसाचा इशारा जारी करण्यात आला आहे. उत्तर प्रदेशात, गेल्या तीन दिवसांत वादळ-पावसाशी संबंधित घटनांमध्ये मृतांचा आकडा ६० वर पोहोचला आहे. त्याच वेळी, राजस्थानच्या पश्चिम भागात २७ मे पर्यंत उष्ण वाऱ्यांमुळे रेड अलर्ट आहे. शुक्रवारी जैसलमेरमध्ये कमाल तापमान ४८ अंश होते. ते आणखी वाढू शकते.

हवामान खात्याने केरळच्या किनारी आणि अंतर्गत भागात वादळाचा इशारा जारी केला आहे. मच्छिमारांसह सामान्य लोकांना खबरदारी घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे. केरळ, कर्नाटक आणि लक्षद्वीपच्या किनाऱ्यावर २७ मे पर्यंत मासेमारीसाठी समुद्रात जाण्यास बंदी घालण्यात आली आहे.

T&C
शालेय विद्यार्थ्यांसाठी खास ऑफर
आता कॉम्प्युटर सेट 7500 रु.
आकर्षक भेटवस्तू फ्री..
सिक्युअर कॉम्प्युटर्स
दिल्लीगेट, अहिल्यानगर
7304099919

# केबलचे काम करताना विजेचा शॉक बसून मृत्यू

नगर - केबलचे काम करीत असताना विजेचा शॉक बसून एकाचा मृत्यू झाल्याची घटना रेल्वे स्टेशन रोडवरील शिवनेरी चौकाजवळील संभाजी कॉलनी येथील मातोश्री अपार्टमेंट येथे २३ मे रोजी दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास घडली. रमेश प्रेमराज चायाल (वय ६० रा. आनंद सोसायटी, सीता अपार्टमेंट, रेल्वे स्टेशन) असे मयताचे नाव आहे.


रमेश चायाल

रमेश चायाल हे केबलचे काम करण्याकरिता संभाजी कॉलनी येथील मातोश्री अपार्टमेंटच्या टेरेसवर काम करीत असताना केबल विजेच्या तारेवर पडल्याने त्यांना विजेचा शॉक बसला. त्यांना तातडीने जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी नेले असता तेथील डॉक्टरांनी त्यांना तपासून ते उपचारापूर्वीच मयत झाले असल्याचे घोषित केले.

याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात जिल्हा शासकीय रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉक्टर वने यांनी दिलेल्या माहितीवरून आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मयत रमेश चायाल यांच्यावर २४ मे रोजी नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी दोन मुले असा परिवार आहे. सागर व मंदार चायाल यांचे ते वडील होत.

भावी नगरसेवक
युवा नेतृत्व..
विकी शेठ इंगळे
आपणास वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा
माजी नगराध्यक्ष कै. बाबुराव इंगळे, माजी नगरसेविका कै.सुंदराबाई बाबुराव इंगळे यांचे नातू उद्योजक विकीशेठ इंगळे
व राजकारणातील वारसा जपणारे आजी व आजोबाच्या पावलावर पाऊल ठेवून सामाजिक कामे करणे व गोरगरीब जनतेसाठी मदतीसाठी हात पुढे दाखवणे..
युवा नेतृत्व विकीशेठ इंगळे
यांना वाढदिवसाच्या इंगळे प्रतिष्ठानच्या वतीने हार्दिक शुभेच्छा!
✲ शुभेच्छुक ✲
सचिन चव्हाण , बंटी शेजुळ , सूरज थापा , किरण अडागळे, जय गजरमल , बंटी साबळे , जय वडागळे, जय इंगळे , विनोद शिरसाठ
इंगळे प्रतिष्ठाण सर्जेपुरा, अहिल्यानगर

कॅन्सर ला घाबरु नका, तज्ञ डॉक्टरांचा योग्य सल्ला घ्या!
MEDICAL & SURGICAL ONCOLOGY
INDO IRISH HOSPITAL
आता पूर्ण वेळ अहिल्यानगर मध्ये
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना
आयुष्मान भारत योजना
मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी
STAR | Oriental Insurance | RELIANCE General Insurance | BAJAJ Allianz | SBI general | TATA AIG | HDFC ERGO | care HEALTH INSURANCE
व इतर सर्व कॅशलेस इंशुरन्स उपलब्ध...
Tapowan Road, A. Nagar
For Appointment 913042 3336 | 9860310001

घरगुती पेशंटसाठी मावशी पाहिजे असेल
तर संपर्क किंवा घरगुती काही काम असतील तर स्वयपाक भाडे किंवा बाळ सांभाळण्यासाठी मावशी पाहिजे असेल तर संपर्क
7378706893

पुनर्विवाह वधू पाहिजेत
अपंग, लंगडी, मुकी, बहिरी, व्यंग, निराधार, पिडीत महिला आधार, जीवनाला कंटाळलेले, आधार नसलेले विधवा २२ ते ६० वय असलेले भेटा..
9892911602

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

# गुन्हेगारी रोखण्यासाठी सर्व पोलिस अधिकारी, कर्मचारी एकत्र प्रयत्न करतील : पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे

नगर – राजकीयदृष्ट्या प्रबळ असलेल्या अहिल्यानगर जिल्ह्यात गुन्ह्यांचे प्रमाण जास्त आहे. तसेच, राज्यात क्षेत्रफळाने सर्वात मोठा हा जिल्हा आहे. या जिल्ह्यात सर्व प्रकारच्या क्राईमच्या घटना घडत असल्याने पोलिसांसाठी हा आव्हानात्मक जिल्हा आहे. पोलिसांकडून नागरिकांना अनेक अपेक्षा असतात. नागरिकांच्या या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी, जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी सर्व अधिकारी व कर्मचारी मिळून प्रयत्न करतील, असे प्रतिपादन पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी केले.

अधीक्षक घार्गे यांनी २३ मे पदाचा कार्यभार स्वीकारताच सर्व विभागांचा आढावा घेतला. त्यानंतर पोलिस मुख्यालयात पोलिस अधीक्षक

## पदभार स्वीकारताच घेतला सर्व विभागांचा आढावा

राकेश ओला यांना निरोप देऊन नूतन अधीक्षक घार्गे यांचे पोलिस दलाच्या वतीने स्वागत करण्यात आले. यावेळी ओला यांनी त्यांचे स्वागत केले. अपर पोलिस अधीक्षक प्रशांत खैरे, वैभव कलुबर्मे आदींसह सर्व प्रमुख अधिकारी उपस्थित होते. पोलिस अधीक्षक घार्गे म्हणाले की, महिला, ज्येष्ठ नागरिक, बालक, विविध समाज घटक डोळ्यासमोर ठेवून काम केले जाईल. कर्मचाऱ्यांचे प्रश्नही सोडवले जातील. नागरिकांना तत्काळ मदत मिळेल, यादृष्टीने काम करू, असेही ते म्हणाले.

दरम्यान, अधीक्षक ओला म्हणाले, जिल्ह्यात पोलिसांचे मनुष्यबळ कमी आहे. त्या तुलनेत गुन्हेगारी जास्त असल्याने पोलिसांवर कामाचा ताण निश्चित आहे. वाढते गुन्हे आणि मोठा जिल्हा, यामुळे या जिल्ह्यात काम करणे मोठे आव्हान होते. लोकसभा आणि त्यानंतर झालेल्या विधानसभेच्या निवडणूका पार पाडण्याचे मोठे आव्हान पोलिस प्रशासनासमोर होते. या दोन्ही निवडणूका शांततेत पार पडल्या. पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सहकार्यामुळेच जिल्ह्यात चांगले काम करता आले, असे ते म्हणाले. यावेळी अपर अधीक्षक प्रशांत खैरे, वैभव कलबुर्मे, पोलिस निरिक्षक दिनेश आहेर, उपअधीक्षक अमोल भारती, निरिक्षक आनंद कोकरे यांनी मनोगत व्यक्त केले.




पोलीस अधीक्षक राकेश ओला यांच्याकडून पदभार स्वीकारताना पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे. (छाया – बबलू शेख)

## प्रेरणादायी अक्षरधन...







### आम्ही कोण? कोठून आलो? कुठे जाणार?

या जगात आल्यावर प्रत्येक जीव जन्म ते मृत्यूपर्यंत अनेक दुःख, यातना, विरह, व्याधी भोगत असतो. आपण कोण आहोत, कुठून आलोत? आपलं गंतव्य काय? निहीत कर्तव्य काय? आपला धर्म काय? बंधनं कोणती? अधर्म काय? विवेक काय? अनीती काय?

या सर्व मुलभूत प्रश्नांचा, गोष्टींचा आपण सामान्य मानव किंचितही विचार करीत नाही. पण विवेकी, ज्ञानी व मानव कल्याणाची चिंता करणारा महा आत्मा या गोष्टींचा निरंतर-सातत्याने विचार करीत असतो.

कारण आपण सामान्य माणूस अज्ञानी आहोत. इंद्रिय व संसारी भोगातच सुख असतं असं अज्ञानाचं आवरण आपण सामान्यांच्या बुद्धीवर घातलं गेलं आहे.

स्त्री, पुत्र, भूमी, संपदा या गोष्टीत मानवाला कधीच खरं सुख प्राप्त होत नसतं. खरं शाश्वत सुख प्राप्त व्हायचं असेल तर आपण सर्वसामान्य मानवानं ते खरं ज्ञान प्राप्त करण्याचा सातत्यपूर्ण विचार, चिंतन, मनन करायला हवं. भावपूर्ण नामस्मरण, पूजाअर्चना इ. द्वारे खऱ्या जीवन सार्थकतेची अन् शाश्वत जीवनमूल्य व अंतिम उद्दिष्टाची आस धरली पाहिजे.

प्रत्येक प्राणिमात्रात (केवळ मनुष्य नाही दतर निसर्ग व निसर्गातील सर्व जीव) आत्मा आहे. अन् हे सर्व आत्मा त्या (अनाकलनीय) परमात्म्याशी तादात्म्य पावलेलो आहोत. किंबहुना आपण सर्वच त्या परमात्म्याचा अंश आहोत याची सदैव स्मरण करीत सावधान राहावे लागेल. या आत्मा-परमात्म्याची जाणीव असणे याला, या विशेष ज्ञानालाच परमार्थ म्हणतात. मी-मी- आणि द्वैतभाव करणाऱ्याला हे कळतही नाही... वळतही नाही... कळतंय का?...

## राहुरी-शनि शिंगणापूर नवीन रेल्वे मार्गाला रेल्वे मंत्रालयाकडून मंजुरी

नगर – रेल्वे मंत्रालयाने महाराष्ट्रातील राहुरी ते शनि शिंगणापूर दरम्यान २१.८४ किलोमीटर लांबीच्या नवीन रेल्वे मार्गाच्या बांधकामास मंजुरी दिली आहे. सुमारे ४९४.१३ कोटी रुपयांच्या खर्चात हा मार्ग उभारण्यात येणार आहे.

शनि शिंगणापूर हे दररोज ३०,००० ते ४५,००० भाविकांची गर्दी असलेले प्रसिद्ध धार्मिक स्थळ आहे. सध्या येथे थेट रेल्वे सुविधा नसल्यामुळे यात्रेकरूंना अडचणींचा सामना करावा लागतो. नवीन रेल्वे मार्गामुळे भाविकांसह राहुरी, नेवासा आणि परिसरातील नागरिकांच्या प्रवासाला मोठी सुविधा होणार आहे.

या रेल्वे मार्गामुळे शिर्डी, राहुरी येथील राहु-केतू मंदिर, नेवासा येथील मोहिनी राज मंदिर, पैस खांब करवीरेश्वर मंदिर यांसारख्या धार्मिक पर्यटन स्थळांना चालना मिळणार आहे, परिणामी स्थानिक पर्यटन व अर्थव्यवस्था मजबूत होईल.

सविस्तर प्रकल्प अहवालानुसार (डीपीआर) दररोज चार जोड्या प्रवासी गाड्यांचा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे, ज्यामुळे वार्षिक १८ लाख प्रवाशांना फायदा होईल.

या प्रकल्पाला जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील व डॉ. सुजय विखे पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे मंजुरी मिळाली आहे. तसेच केंद्रीय मध्य रेल्वे सल्लागार समिती सदस्य सुदर्शन डुंगरवाल यांनी सातत्याने पाठपुरावा करून मंजुरी मिळाली आहे. शनि शिंगणापूर हे भारतातील एक महत्त्वाचे आध्यात्मिक केंद्र असून, या प्रकल्पामुळे पायाभूत सुविधा मजबूत होतील व पर्यटनाला चालना मिळेल, असे सुदर्शन डुंगरवाल यांनी म्हटले आहे.

## आलमगीर येथे तिघांकडून एकास बेदम मारहाण

नगर – तुम्ही खूप माजले आहेत, तुमच्याकडे पहावे लागेल असे म्हणून तिघांनी एकाला शिवीगाळ दमदाटी करीत हाताच्या चापटीने, लाथा बुक्क्यानी मारहाण केली. तसेच नीट राहिले नाही तर तुमचा मर्डर करु अशी धमकी दिली. ही घटना आलमगीर येथील मिलिंद कॉलनी येथे २२ मे रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत शेखर सुखदेव त्रिमुखे (वय ४३, रा. मिलिंद कॉलनी, आलमगीर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की सायरा आयुब शेख, अल्ताफ उर्फ भुऱ्या आयुब शेख, अहमद आयूब शेख (सर्व रा. मिलिंद कॉलनी आलमगीर) यांनी फिर्यादी यांना तुम्ही खूप माजले आहे. तुमच्याकडे पहावे लागेल असे म्हणून शिवीगाळ करुन हाताच्या चापटीने मारहाण केली. जर तुम्ही नीट राहिले नाही तर तुमचा मर्डर करु अशी धमकी दिली असे फिर्यादीत म्हंटले आहे.

याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात शेखर त्रिमुखे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन तिघांविरुद्ध बी एन एस ११५ (२), ३५१ (२) (३), ३५२ प्रमाणे गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक इंगळे हे करीत आहे.

## काचेची बाटली डोक्यात फोडून मारहाण; गुन्हा दाखल

नगर – काही कारण नसताना शिवीगाळ केली म्हणून त्याबाबत विचारणा केल्याने तरुणाच्या डोक्यात काचेची बाटली फोडून त्यास जखमी केले. तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना २२ मे रोजी रात्री साडेदहा वाजता केडगाव येथील हॉटेल रत्नज्योत जवळ घडली.

याबाबत शंकर पांडुरंग क्षीरसागर (वय ३८, रा. शिवांजली लॉन जवळ, भूषण नगर, केडगाव) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे त्यांचा मित्र संतोष पवार (रा. पवार वस्ती, केडगाव) याच्यासह हॉटेल रत्नजोत समोर रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास बोलत असताना त्या ठिकाणी अमोल पाडळे (पूर्ण नाव माहित नाही. रा. नीलक्रांती चौक, अ.नगर) व त्याच्यासोबत एक अनोळखी इसम असे आले. त्यांनी फिर्यादीस शिवीगाळ केली. त्यावेळी फिर्यादी यांनी शिवीगाळ का करतोस असे म्हटले असता अमोल पाडळे याने त्याच्या हातातील काचेची बाटली फिर्यादीच्या डोक्यात मारली केली. फिर्यादीच्या डोक्यातून रक्त येत असल्याने संतोष पवार याने त्यांना उपचाराकरिता दवाखान्यात नेले. तेव्हा अमोल पाडळे हा तेथे आला व तेथेही शिवीगाळ करुन जीवे ठार मारण्याची धमकी दिली असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे. याप्रकरणी शंकर क्षीरसागर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन पोलिसांनी अमोल पाडळे याचे विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# प्लॉट घेऊन देतो असे सांगून महिलेची दीड लाखाची फसवणूक; गुन्हा दाखल

नगर – प्लॉट घेऊन येतो असे सांगून प्लॉट दाखवून ठरलेल्या व्यवहाराप्रमाणे १ लाख ५० हजार रुपये घेऊन त्याची इसार पावती दिली नाही व प्लॉटचे मूळ कागदपत्रही देण्यास टाळाटाळ करुन प्लॉटची खरेदी न देता फसवणूक केल्याची घटना १६ जानेवारी ते २५ फेब्रुवारी दरम्यान घडली.

याबाबत आरती गोविंदा लड्ढा (वय ३६, रा. दातरंगे मळा, नालेगाव) यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांच्या पतीने त्यांच्या ओळखीचे शिवाजी काळे यांना प्लॉट घ्यायचा आहे असे सांगितल्याने त्याने त्यांच्या ओळखीचे योगेश गरुड व अरुण देठे यांना प्लॉट दाखवण्यास सांगितले. त्याप्रमाणे गरुड व देठे यांनी छत्रपती संभाजी नगर रोडवरील पोखर्डी येथे प्लॉट दाखवला व बाकीचे व्यवहार अमोल विजय वाघमारे (रा. पानसवाडी शनिशिंगणापूर, ता. नेवासा) यांच्या तारकपूर बसस्टॅन्ड येथील ऑफिसमध्ये करण्यास सांगितले.

फिर्यादी यांनी पतीसह तेथे जाऊन व्यवहार ठरल्याप्रमाणे अमोल वाघमारे यांना ५० हजार रुपयाचा चेक, त्यानंतर ४० हजार रुपये रोख रक्कम व ऑनलाईन दहा हजार रुपये, तसेच अमोल वाघमारे यांना पन्नास हजार रुपये रोख दिले. नंतर वाघमारे यांनी फिर्यादी यांना प्लॉट खरेदी करण्यासाठी मूळ मालका सोबत भेट घालून दिली नाही. तसेच दिलेल्या पैशाची इसार पावती करुन दिली नाही. फिर्यादी यांनी प्लॉटचे मूळ कागदपत्र मागितले असता वाघमारे यांनी कागदपत्र दाखवण्यास टाळाटाळ केली व प्लॉटची खरेदी दिली नाही. याबाबत फिर्यादी यांनी पोलीस अधीक्षक यांच्याकडे तक्रार अर्ज दिला होता त्या अर्जाच्या सुनावणीनंतर तोफखाना पोलिसांना गुन्हा दाखल करण्याचे आदेश देण्यात आले. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात आरती लड्ढा यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अमोल वाघमारे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. तपास पोलीस नाईक देविदास आव्हाड करीत आहे.

## शंकरराव ढवळे यांचे अल्पशा आजाराने निधन

नगर – जुने कलेक्टर ऑफीस येथील रहिवासी शंकरराव छगन



ढवळे (पोस्टमन) (वय ७६) यांचे २२ मे रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, १ मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ॲड. सचिन ढवळे व वैशाली ढवळे यांचे ते वडील होत.

## सौ. मनिषा जाधव यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर – कर्जुले हरेश्वर येथील रहिवासी सौ. मनिषा विलास जाधव (वय ४५ ) यांचे २४ मे रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर कर्जुले हरेश्वर येथे काळझाप वस्ती येथे अंत्यसंस्कार करण्यात आला.

त्यांच्या मागे पती, १ मुलगा, १ मुलगी असा परिवार आहे. डॉ. विलास विष्णू जाधव यांच्या त्या पत्नी होत.

## प्रा. अक्षय अंबाडे यांचे अपघाती निधन



नगर – रास्तापूर नेवासा येथील रहिवासी ॲनिमेशनचे प्राध्यापक अक्षय अंबाडे (सर) (वय २९) यांचे २३ मे रोजी अपघाती निधन झाले. त्यांच्यावर रास्तापूर नेवासा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, वडील, पत्नी, मुलगी असा परिवार आहे.

## सुनील हंगेकर यांचे अपघाती निधन



श्रीरामपूर – येथील संत नामदेव शिंपी समाज पंच मंडळाचे माजी सचिव सुनील काशिनाथ हंगेकर (वय ६१) यांचे वडाळा महादेव जवळ अपघाती दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन विवाहित मुली, एक मुलगा, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. चि.यश हंगेकर यांचे वडील होत.

## यशोदाबाई खलाणे यांचे वृद्धापकाळाने निधन

श्रीरामपूर – येथील यशोदाबाई निलकंठ खलाणे (वय ८५)



यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सून, जावई, नातवंडे, पतवंडे, नातसून असा परिवार आहे. बांधकाम व्यावसायिक बापू खलाणे व छोटू खलाणे यांच्या मातोश्री, चि.विशाल, देविदास व लक्ष्मण खलाणे यांच्या आजी होत.



वीर जवान संदीप गायकर यांना शासकीय इतमामात अखेरचा निरोप देण्यात आला.

## वीर जवान संदीप गायकर यांना शासकीय इतमामात अखेरचा निरोप

### पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी वाहिली श्रद्धांजली

शिर्डी – जम्मू-काश्मीरमधील तिसवाड सेक्टर येथे सुरू असलेल्या सर्च ऑपरेशनदरम्यान दहशतवाद्यांशी झालेल्या चकमकीत शहीद झालेले अकोले तालुक्यातील ब्राह्मणवाडा गावचे सुपुत्र संदीप पांडुरंग गायकर यांच्यावर त्यांच्या गावी शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. हजारो नागरिकांनी साश्रुनयनांनी त्यांना अखेरचा निरोप दिला. जलसंपदामंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी त्यांच्या पार्थिवावर पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.

संदीप पांडुरंग गायकर (वय ३२) लष्कराच्या १५ मराठा लाईट इन्फंट्रीमधील १७ राष्ट्रीय रायफल्समध्ये सैनिक पदावर कार्यरत होते. तिसवाड सेक्टर येथे दहशतवाद्यांशी झालेल्या चकमकीत २२ मे रोजी कर्तव्य बजावत असताना संदीप गायकर यांना वीरमरण आले. २४ मे रोजी सकाळी त्यांचे पार्थिव ब्राह्मणवाडा येथे आणण्यात आले. लष्कर व स्थानिक प्रशासनाच्या उपस्थितीत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार पार पडले.

भारतीय लष्कराच्या पथकांनी हवेत बंदुकीच्या फैरी झाडून त्यांना मानवंदना दिली. 'भारत माता की जय' व 'शहीद जवान संदीप गायकर अमर रहें' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. मुलगा रिहांस ह्याने त्यांच्या पार्थिवाला मुखाग्नि दिला. आमदार डॉ. किरण लहामटे, आमदार अमोल खताळ, माजी खासदार सदाशिवराव लोखंडे, माजी आमदार वैभव पिचड, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, पोलीस उपअधीक्षक डॉ. कुणाल सोनवणे, तहसीलदार सिद्धार्थ मोरे, पोलीस निरीक्षक मोहन बोरसे, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी स्कॉड्रन लीडर विद्यासागर कोरडे, लष्कराच्या वतीने कर्नल केतन प्रसाद तसेच इतर मान्यवरांनी पुष्पचक्र अर्पण करून शहीद संदीप गायकर यांना श्रद्धांजली वाहिली.

''संदीप गायकर यांनी देशासाठी दिलेले बलिदान आम्हा सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. ब्राह्मणवाडा येथे त्यांचे स्मारक उभारण्यात येईल. त्यांच्या कुटुंबीयांच्या दु:खात प्रशासन सहभागी असून कुटुंबीयांना शासन सर्वतोपरी मदत करेल,'' अशा शब्दांत पालकमंत्री श्री. विखे पाटील यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

जवान संदीप गायकर हे वयाच्या २० व्या वर्षी सैन्य दलात भरती झाले होते. त्यांनी गांधीनगर, जम्मू व काश्मीरमधील पुंछ सेक्टर, ५६ राष्ट्रीय रायफल्स, मध्य प्रदेशमधील घाना सागर व युनायटेड नेशन्स येथे सेवा बजावली होती. त्यांच्या पश्चात वडील, आई, पत्नी व मुलगा असा परिवार आहे.

## नगर शहरातील नागरिक सध्या अक्षरशः 'नरक यातना' भोगत असताना निवडणुकीच्या वेळी जनतेचा अतिशय कळवळा भासवणारे सगळे गेले कुठे?

(पान १ वरुन)

बसलेत असा संतप्त सवालही उपस्थित केला जात आहे.

शहराला लाभलेले अधिकारी तर येताना असे येतात की नव्या नवरीचे नऊ दिवस अशी मराठीत म्हण आहे ती जणू जाताना तंतोतंत खरी ठरून जातात. ते आल्यानंतर शहराला विकासाकडे घेऊन जाण्याचे फक्त आश्वासन देऊन विसरून जातात की काय ? का कुणाच्या दबावाखाली दडपणाखाली येऊन शासनाने दिलेला कार्यकाळ पूर्ण करून कधी एकदाचा नगरला राम राम ठोकतो अशी परिस्थिती त्यांच्यावर येते की काय असा प्रश्न आता नगरकरांना मनात घर करू लागला आहे.

### नगरकरांनो सध्याचे रस्त्याचे फोटो काढून संग्रही ठेवा

लवकरच महापालिकेच्या निवडणुकीचा बिगुल वाजण्याची शक्यता आहे, त्यामुळे हवसे, नवसे, गवसे गुडघ्याला बाशिंग बांधून बसलेले आहेतच हे ही महाशय असे अवतरतील की जनतेच्या सेवेस आम्हीच आहोत. आम्हीच जनतेचे प्रश्न मार्गी लावणार आहोत आणि यांच्या भूमिकेबाबत शंका येईल इतकी जनतेची ते सेवा करण्याचे भपारे मारतील. त्यांची बोलती बंद करण्यासाठी नगरकरांनी सध्या शहरातील रस्त्यांची आणि ठिकठिकाणी साचलेल्या कचऱ्याची छायाचित्रे आपल्या मोबाईल मध्ये कैद करून संग्रहित ठेवावीत व वेळ येताच त्यांना नक्कीच दाखववीत. सध्या तरी एवढेच आपल्या हातात राहिले आहे. अशा शब्दात अनेक नागरिकांनी आपल्या भावना दैनिक नवा मराठाशी बोलताना व्यक्त केल्या आहेत.



रात्रीच्या वेळी पथदिवे बंद असताना रस्त्यांवर पावसाच्या साचलेल्या पाण्यातून वाहने ढकलण्याची कसरत करताना नागरिक. (छाया – अमित मन्यार)

## कुत्र्याला हाकलल्याच्या कारणावरुन एकास चौघांनी केली बेदम मारहाण

नगर – कुत्र्याला हाकलल्याच्या कारणावरुन चौघांनी एकास शिवीगाळ दमदाटी करीत लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केल्याची घटना नगर तालुक्यातील वाटेफळ येथे २३ मे रोजी सकाळी ८.३० वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत फिरोज याकूब सय्यद (वय ४०, रा. वाटेफळ, ता. नगर) यांनी नगर तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. यामध्ये म्हटले आहे की, मुबारक हसन सय्यद यांनी पाळलेला कुत्रा फिर्यादी यांच्या पायाला चावला. त्यावेळी फिर्यादी कुत्र्याला हाकलून देत असताना मुबारक सय्यद त्यांच्याजवळ आले व म्हणाले तू आमच्या कुत्र्याला का मारहाण करतोस. त्यावर फिर्यादी म्हणाले की तुमचा कुत्रा मला चावला आहे. मी त्याला मारहाण केली नाही. असे म्हंटल्याचा राग येवून मुबारक याने फिर्यादीस शिवीगाळ करुन लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यावेळी झालेल्या आरडाओरडीमुळे फिर्यादीची पत्नी तेथे आली असता मुबारक याने तुझ्या नवऱ्याने आमच्या कुत्रा दगडाने मारहाण केली, चल तुला दाखवतो अशी धमकी दिली. त्यावेळी त्यांना समजून सांगत असताना निसार मुबारक सय्यद, अरिफ मुबारक सय्यद, सुन्न मुबारक सय्यद (सर्व रा. वाटेफळ) यांनी त्यांना शिवीगाळ करुन धमकी देत मारहाण केली.

याप्रकरणी फिरोज सय्यद यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नगर तालुका पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध मारहाणीचा गुन्हा करण्यात आला आहे.

## वहिवाटीच्या रस्त्यावर अडथळा करुन शिवीगाळ करीत जीवे मारण्याची धमकी

नगर – वहिवाटीच्या रस्त्यावर सिमेंट खडी टाकून जाण्यायेण्यास अडथळा निर्माण करुन तिघांकडून एकास शिवीगाळ दमदाटी करीत खुनाची धमकी दिल्याची घटना मोची गल्ली येथे २० मे रोजी घडली.

याबाबत जावेद इब्राहिम रंगरेज (वय ३५, रा. मोची गल्ली अ.नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की मीरा शफी रंगरेज, गफूर शफी रंगरेज, रफिक शफी रंगरेज (सर्व रा. बोहरी मस्जिद, काटे गल्ली अ.नगर) यांनी फिर्यादी व फिर्यादीच्या कुटुंबीयास त्रास देण्याच्या उद्देशाने फिर्यादीच्या घराचे खालील बाजूस असणाऱ्या बाथरूमचा दरवाजा तोडून व बाथरुमच्या भांड्यामध्ये सिमेंट खडी भरुन फिर्यादी यांना त्यांच्या जाण्यायेण्याच्या, वहिवाटीच्या मार्गावर अडथळा निर्माण केला. तसेच फिर्यादी व त्यांचे परिवाराच्या जीवास धोका निर्माण होईल. असे वर्तन करुन फिर्यादीस शिवीगाळ दमदाटी केली व जीवे ठार मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात जावेद रंगरेज यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन मीरा रंगरेज, गफूर रंगरेज, रफिक रंगरेज यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास महिला पोलीस नाईक वंदना काळे या करीत आहे.

## वैदुवाडीत कुत्रा पाळण्याच्या कारणावरून दोन भावांना मारहाण; गुन्हा दाखल

नगर – वैदुवाडी, सावेडी परिसरात कुत्रा पाळण्याच्या कारणावरून झालेल्या वादात दोन भावांना मारहाण झाल्याची घटना २२ मे रोजी घडली आहे. या प्रकरणी तिघांविरूध्द तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी नवनाथ मच्छिंद्र शिंदे (वय २४, रा. लक्ष्मी माता मंदिराशेजारी, वैदुवाडी) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांनी कुत्रा पाळला आहे. त्याला शेजारच्या मोकळ्या जागेत पिंजऱ्यात ठेवले होते. यावेळी शेजारी राहणारा सचिन संतोष शिंदे याने हातातील लाकडी काठीने त्या कुत्र्याला मारहाण करण्यास सुरूवात केली. याविरोधात नवनाथ व त्याचा भाऊ गोरख शिंदे यांनी विरोध केला असता, सचिनने रागाच्या भरात शिवीगाळ करत हातातील कोयत्यासारख्या वस्तूने नवनाथच्या कपाळावर वार केला. त्यातून दुखापत झाली. दरम्यान, नवनाथचा भाऊ गोरख यांनाही संतोष बाबू शिंदे याने लाकडी काठीने मारहाण करत जखमी केले. यावेळी ताई संतोष शिंदे हिने शिवीगाळ केली. तसेच, तुम्ही आमच्या नादाला लागू नका, नाहीतर जिवे मारून टाकीन, अशी धमकीही दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे. घटनेनंतर जखमी नवनाथ व गोरख शिंदे यांनी तत्काळ पोलीस ठाणे गाठले. पोलिसांनी त्यांना रूग्णालयात उपचारासाठी पाठवले. त्यानंतर त्यांनी तिघांविरूध्द फिर्याद दिली. पोलिसांनी सचिन शिंदे, संतोष शिंदे व ताई शिंदे (तिघे रा. वैदुवाडी, सावेडी) यांच्याविरूध्द गुन्हा दाखल केला आहे. महिला पोलीस अंमलदार संजीवनी नेटके तपास करीत आहेत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### करा इंटरव्हल वॉकींग

जपानी इंटरव्हल वॉकिंग हे एक संरचित चालण्याचे तंत्र आहे, ज्यात मध्यम ते वेगवान चालणे आणि हळू चालणे यांचा समावेश असतो. याला इंटरव्हल वॉकिंग ट्रेनिंग असेही म्हणतात. या पद्धतीने ३० मिनिटे चालल्यास १०,००० पावले चालण्यापेक्षा अधिक फायदे मिळतात. सुरुवातीला ३ मिनिटे हळू चालणे, नंतर ३ मिनिटे मध्यम ते वेगवान चालणे, हे ३-३ मिनिटांचे इंटरव्हल १० वेळा करा, एकंदरीत ३० मिनिटे चालणे. याने शरीराची चरबी जाळायला मदत होते, शरीराचे स्नायू मजबूत होतात, शरीरातील रक्त गोठण्यास प्रतिबंध होतो, शरीरातील सांधेदुखी कमी होते आणि आपला मुडही चांगला राहतो.

## पाककला

### कारले कांदा कुरकुरे

**साहित्य :** १/२ वाटी कारले चिप्स सुकवलेले, १/४ वाटी कांदे चिप्स सूकवलेले, १/४ वाटी शेंगदाणे आणि काजू, १ टेबलस्पून हळद, लाल मिरची, चाट मसाला, आमचूर पावडर, धणे, जीरे, १/४ टेबलस्पून चिवडा मसाला, मनुके, कडीपत्ता, काळे मीठ चवीनुसार, पिंक सॉल्ट, १/४ वाटी तेल, १ टीस्पून लसूण पावडर, १ टेबलस्पून राई, २ सुक्या लाल मिरच्या

**कृती :** प्रथम तेल गरम करावे आणि नंतर मंद आचेवर कारले कांदा चीपस तळून घ्यावेत, आणि नंतर काजू, शेंगदाणे तळून घ्यावेत आता फोडणी करिता पसरट टोपात त्यातल गरम तेल दोन चमचे घेऊन तेल गरम करावे नंतर प्रथम राई फोडणीला घालून तडतडली की त्यात कडीपत्ता, लाल मिरच्या घालून छान परतून घ्यावे नंतर त्यात तळून ठेवलेले कारले, काजू, शेंगदाणे घालावे आणि नंतर त्यात सगळे मसाले घालून हलवून घ्यावे अगदी शेवटी मीठ, लसूण पावडर, कांदे घालून हलवून घ्यावे (कांदे चिपस जास्त हलवू नका कारण ते फार हलके अस्तात) टेस्टी चीवडा तयार आहे. एअर टाईट काचेच्या बरणीत भरून ठेवावे.

## वास्तू

### कॅश काऊंटर कसे असावे?

कॅश काउंटर उत्तर किंवा नैऋत्य दिशेला असावे. जर कॅश काउंटर नैऋत्य दिशेला असेल तर दुकानांचे प्रवेशद्वार उत्तर दिशेला असावे. कॅश बॉक्स कधीही रिकामा ठेवू नका; त्यात नेहमी काही सैल नाणी किंवा चलनी नोटा ठेवा. कॅश बॉक्स अशा दिशेला ठेवा की तो वॉशरूम, स्टोअररूम, मुख्य गेट किंवा पायऱ्यांवरून दिसणार नाही. दुकानाचे काउंटर चौकोनी असावे. वर्तुळाकार काउंटर असल्यास नुकसान होते. ते आग्नेय किंवा नैऋत्य दिशेला ठेवावे. तुमच्या दुकानाचे काउंटर नेहमी नीटनेटके आणि स्वच्छ ठेवा.

## सल्ला

तृणधान्याचे डबे किंवा डबाबंद अन्न यासारख्या काही नाशवंत नसलेल्या वस्तू साठवण्याची योजना आखत असाल तर फ्रिजचे तापमान ३८ अंशांवर सेट करा.

## सौंदर्य

उन्हामुळे हात आणि पाय काळे झाले असतील तर, लिंबाच्या रसासोबत साखरेचा वापर करून तुम्ही हाता-पायांना स्क्रब करू शकता. यामुळे त्वचेवरील मृत पेशी निघून जातील आणि काळेपणा कमी होईल. कच्चे दूध आणि गुलाबपाणी मिसळून हाता-पायांना लावा आणि मसाज करा.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

रविवार, दि. २५ मे २०२५

**शिवरात्रि, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, वैशाख कृष्णपक्ष, अश्विनी ११।१२, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. ४१ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** ओळखीने कामे होतील. अनावश्यक घटनांची चर्चा करण्यात वेळ आणि ऊर्जा वाया घालवाल. अडकलेला पैसा मिळेल.

**वृषभ :** शैक्षणिक संधी मिळेल, विकासात्मक कामांना वेग येईल. रम्य सहली तुम्हाला आनंदी आणि रिलॅक्स करतील. आपल्या प्रयत्नांमुळे व्यापारात वृद्धि होईल.

**मिथुन :** तरुणांना नोकरीत भाग्योदय. शारीरिक तसेच मानसिकदृष्ट्या तुम्हाला खचल्यासारखे वाटेल. दिवस कालच्या इतका चांगला जाणार नाही.

**कर्क :** वस्तू गहाळ होतील तसेच कामे रेंगाळतील, दिवस आळसात जाईल. परदेशागमनाचे योग आहेत.

**सिंह :** परिचितांवर खर्च शक्य, प्रवास होईल. तणावमुक्तीसाठी तुमच्या मुलांसोबत मौल्यवान वेळ घालवाल. वाहने व उपकरणे चोरी जातील.

**कन्या :** नव्या क्षेत्रात शिरकाव होईल, वेगळेपणा भाव खाऊन जाईल. अत्यंत व्यस्त दिवस असला तरी आरोग्य चांगले राहील.

**तूळ :** कलेत रुची राहील. स्त्री वर्गाला लाभ, माता-पित्यांना ताण. धार्मिक कार्य सफल होतील. कामाला वाव मिळेल. आपले निर्णय, विचार समोरच्याला पटतील.

**वृश्चिक :** उत्तम विकास, कामात विलंब होणार, चर्चेचे गुऱ्हाळ राहील मात्र आनंदाने परिपूर्ण असा चांगला दिवस असेल.

**धनु :** हेवे-दावे होतील. स्वतः धावपळ होईल. तुमच्या सादरीकरणामुळे वरिष्ठांवर प्रभाव पडेल. नवीन कार्य सुरू केल्याने लाभ होईल.


**मकर :** आग्रही मत आणि अभ्यासू वृत्ती यश देणार आहे. वादावादीत हितशत्रूंवर हावी राहाल. जुन्या मित्रांसोबत वेळ व्यतीत कराल.

**कुंभ :** नवी वाट निवडाल. कर्जे देणे-घेणे टाळा. खरेदीत मन रमेल. मागील उधारी उसनवारी वसुल होईल.

**मीन :** देणगीचे वा अनुदान याबाबतचे काम होईल. फसगत होईल. लाभाच्या संधी. नवीन ओळखी होतील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७१८४ सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७१८३ चे उत्तर



**आडवे शब्द :-** १) एक क्षुद्र कीटक; माशी ४) ओळख ७) मकर संक्रांतीला याचे वाटप करून 'गोड बोला' म्हणले जाते ९) तीन गुणांपैकी एक; धूळ १०) तेज: प्रभा: कांती ११) भारतीय सैनिक; तरुण १४) उपहास; फजिती १५) लोणी १७) जंगलाचा राजा; केसरी १९) पराकाष्ठेची मौज अथवा; रंग; हंगाम; विपुलता २०) फुलातील गोड रस; मकरंद २२) कणखर; दणकट; मजबूत २४) तरबेज; निर्ढावलेला; प्रवीण (चोर वगैरे) २५) वडिलोपार्जित चालत आलेली जमीन वगैरे मालमत्ता

**उभे शब्द :-** २) जेथे आकाश व पृथ्वी एकमेकांना चिकटले आहेत असे वाटते ती काल्पनिक रेषा ३) कालावधी; समय; मृत्यू ४) पळून जाण्यासाठीचा रस्ता ५) चल; जंगम; हेर; खंदक ६) यज्ञकर्ता; मालक; पती; स्वामी ८) गुप्त गोष्ट; रहस्य; गूढ १०) एक अरबी देश १२) भारताचे एक माजी व दिवंगत पंतप्रधान १३) कोकणी भाषेत खार १६) धरणी; धरती; रसा; पृथ्वी १८) विरोध; प्रतिकूल वर्तन; अडथळा २०) चामखीळ; तीळ २१) ज्ञानेश्वर, तुकाराम वगैरे विभूती २३) एक हजार किलो किंवा दहा क्विंटल वजनाचे माप

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** चांगल्या लोकांचे एक वैशिष्ट्य असते त्यांची आठवण काढावी लागत नाही, ते कायम आठवणीतच राहतात.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### 'गुड न्यूज' ३ महिने पूर्ण होईपर्यंत का सांगत नाहीत?

गर्भवती आहे हे स्त्रीला समजते ते मासिक धर्म येत नाही तेव्हा. साधारणपणे गर्भधारणा झाल्यानंतर पहिल्या दोन महिन्यात गर्भपात होण्याची शक्यता याच दिवसात जास्त असते. आजकालची जीवनशैली मूळे बऱ्याच स्त्रीयांना यातून जाव लागत. त्यामुळे पहिला एक महिना अन् नंतरचे दोन महिने कोणाला सांगत नाहीत. म्हणजे जवळच्या व्यक्ती, घरातील यांना माहित असतं. अन् त्याने काही फरक पडत नाही. पण दुर्दैवाने ते काही झालं तर लोकांची तोंड चालू होतात म्हणून कोणाला काही सांगत नाही. अन् कोणाला कळू नये म्हणून या गोष्टी पासून वाचण्यासाठी पूर्वजांनी चांगलं नसतं या गोष्टी सोबत जोडलं. जसं बाकीच्या चुकीच्या गोष्टी करताना सांगतात अगदी तसच. रात्रीचे नखे कढून नयेत चांगलं नसतं.

पाळी चुकली कि स्त्री गर्भवती असु शकते आधी असा समज होता आधीच्या काळात काही स्त्रीमध्ये समस्या असेल किंवा हार्मोनल बदलामुळे, टेन्शनमुळे पाळी चुकली असेल असा विचार आधीच्या काळात कुणी करतच नव्हते.

त्यामुळे पाळी चुकली कि बाकीचे लक्षण समजेपर्यंत म्हणजेच ३ महिन्यापर्यंत खात्री पटण्यासाठी सांगत नव्हते जेणेकरून बाकीचे आशा लावून बसणार नाही. हा त्यामागे उद्देश होता.

हि गोष्ट वेगळी आहे कि आता प्रेग्नंसी किट, सोनोग्राफी चा ऑपशन असून सुद्धा ह्या गोष्टी अंधश्रद्धे प्रमाणे पाळतात.


बऱ्याचदा गर्भधारणा झाली आहे हे समजे पर्यंत सव्वा ते दीड महिना निघून जातो. एकदा एक पक्के समजले की लगेच सांगत नाहीत कारण ह्याच दरम्यान गर्भपात होण्याचा धोका सर्वाधिक असतो. म्हणून आपल्याकडे ३ किंवा ४ महिने पुरे झाल्याशिवाय गोड बातमी आहे असे सांगत नाहीत. कधी कधी काही वेळेस वैद्यकिय कारणाने गर्भपात करावा लागतो जसे की ectopic pregnancy, ७ किंवा ८ आठवड्या पर्यंत heart beat नसणे किंवा पुढे वाढ न होऊ शकणे, इत्यादी.

### विश्वासाला तडा

राम नावाच्या एका माणसाकडे एक उमदा आणि सुंदर घोडा होता. तो त्या घोड्याची काळजी घ्यायचा. त्यामुळे त्या दोघांचेही एकमेकांवर प्रेम जडलेले होते. शाम नावाच्या एका घोड्याच्या व्यापाऱ्याने तो घोडा पाहिला आणि त्याला तो घोडा फारच आवडला. शामने तो घोडा मिळविण्याचे कारस्थान रचले. शामने रामच्या रोजच्या येण्याजाण्याच्या रस्त्यावर भिकाऱ्याचे सोंग घेतले व आजारी असल्याचे नाटक करत बसला. दुसरीकडून राम घोड्यावर बसून येत होता तेव्हा शाम जोरजोराने विव्हळू लागला, गयावया करू लागला. रामने ते पाहिले व तो शामपाशी थांबला. शाम रामला म्हणाला, मी आजारी आहे मला तुझ्या घोड्यावरून पुढच्या गावापर्यंत नेशील का, रामला त्याची दया आली, त्याने त्याला घोड्यावर बसविले, आणि स्वतः पायी चालू लागला. थोडे पुढे जाताच शाम त्याचा घोडा घेऊन पुढे गेला व त्याने पुढील गावी जाऊन तो घोडा विकून टाकला. दुसऱ्या दिवशी शाम रामकडे आला व म्हणाला, अरे मी तुझा घोडा जर विकत मागितला असता तर तू मला तो दिला नसतास म्हणून मला आजारी भिकाऱ्याचे सोंग घ्यावे लागले. यावर राम शांतपणे शामला म्हणाला, मित्रा, मी तुला मदत केली होती ही गोष्ट तू इथून पुढे कोणालाही सांगू नकोस कारण तुझी ही गोष्ट ऐकल्यावर जगात कोणीच गरीबांना, गरजूंना मदत करणार नाही. विश्वासघात करणे महापाप आहे

तात्पर्य :- गरजूला मदत करण्यापूर्वी तो खरेच गरजवंत आहे याची खात्री करणे सूज्ञपणाचे ठरते.

## जीवन का अमृत (भाग १)



### सामाजिक आचरण और नैतिक जीवन

इसकी कोई मनाही नहीं है। पर आप ध्यान में रखें कि मैं एक विश्व यात्रा की तैयारी कर रहा जो जल्द ही होगी और अगली बसंत तक मैं आपके देश में पहुँच जाऊँगा और तब आपको मेरे साथ यात्रा करने का मौका मिलेगा। मैं खुशी-खुशी आपकी भक्ति की सुन्दर कविताओं की पांडुलिपि को देखूँगा, जिसे आप इस पवित्र रास्ते पर चलने वाले भाई-बहनों के लाभ के लिए और अमरीका में आश्रम बनाने हेतु धन एकत्रित करने के लिए तैयार करना चाहते हैं। यह प्रभु की दया से, दिव्य उद्देश्य में सहायता करेगी और कई लोगों के लिए प्रेरणा और सहायता का स्रोत बनेगी।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

### विशुद्ध ऊर्जा चक्र

इसकी कोई मनाही नहीं है। पर आप ध्यान में रखें कि मैं एक विश्व यात्रा की तैयारी कर रहा जो जल्द ही होगी और अगली बसंत तक मैं आपके देश में पहुँच जाऊँगा और तब आपको मेरे साथ यात्रा करने का मौका मिलेगा। मैं खुशी-खुशी आपकी भक्ति की सुन्दर कविताओं की पांडुलिपि को देखूँगा, जिसे आप इस पवित्र रास्ते पर चलने वाले भाई-बहनों के लाभ के लिए और अमरीका में आश्रम बनाने हेतु धन एकत्रित करने के लिए तैयार करना चाहते हैं। यह प्रभु की दया से, दिव्य उद्देश्य में सहायता करेगी और कई लोगों के लिए

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## साहित्य सहवास - जिंदगी और कुछ भी नही....'

'ह्या झोपाळ्यावर बसुन गरमागरम चहा पीत आपण दोघांनी अनेक सूर्योदय पाहिलेत. सूर्योदयावेळीची ती प्रसंन्नता, तो छानसा सूर्य, सारं काही मनमोहक, डोळ्यांचं पारणं फेडणारं. आपण दोघेही उगवत्या सूर्याला नमस्कार करायचो. तू म्हणायचीस पावसाळ्यात कधी कधी सूर्यदर्शन व्हायचं नाही तेव्हा नाराज होते. ढगांना बाजुला सारुन ऊगवणारा सूर्य पाहायची तुला इच्छा व्हायची. सूर्योदय झाला की एकमेकांचा हात हातात घेऊन झोका घ्यायचो. खूप छान वाटायचं. रेडिओ ऐकतांना तू एकरूप व्हायचीस ...

अंगणातली बाग तू छान फुलवली होतीस. विविधरंगी गुलाब, जास्वंदीची फुलं, तू पाहातच राहायचीस. म्हणायचीस, मायेनं दिलेलं पाणी, रोपांना आणि मलाही समाधान द्यायचं. कळ्यांपेक्षा उमललेली फुलं तुला खूप आवडायची. एक गुलाब तोडुन, मी, तुझ्या डोक्यावर मध्याभागी ठेवायचो. दोघेही छानच दिसायचे. तू आणि गुलाब. एकदा म्हणाली होतीस, मुलगा, सून, नातू अमेरिकेत आहेत. लेक, जावई, नात बेंगलोरमध्ये आहेत. इथं आपण दोघंच. मुलगा म्हणतो अमेरिकेत या. पण आपल्या दोघांनाही हे घर सोडवंत नाही. आपली अॅटॅचमेन्ट झालीय ह्या वास्तुशी. तुझ्या आवडीचा गुलाबी रंग दिलाय घराला. तु हे सुध्दा म्हणाली होतीस गुलाबी रंगाशी माझं जवळचं नातं आहे. इतक्या साऱ्या रंगांमध्ये तो एकच रंग मला का आवडतो हे कधीच कळलं नाही. बागेला पाणी देऊन झालं की आपण दोघेही घराजवळच्या मंदिरात जायचो. दर्शन घ्यायचो. पायरीवर निवांत बसायचो बराच वेळ. कोवळं ऊन हवहवसं वाटु लागायचं...

तो आत्ता ह्याक्षणी एकटाच झोपाळ्याजवळ उभा राहिला. सूर्योदय आणि झोपाळ्यावर नसलेली ती पाहु लागला. मागील दोन महिन्यांपासून रेडिओ ऐकणं तर त्याने बंदच केलंय. गुलाबी रंगाकडे एकटक पाहात राहातो. तिला गुलाबी रंग का आवडायचा? ह्याचा शोध घेण्याचा तो प्रयत्न करतोय. गुलाबी रंग प्रेमाचं प्रतिक. तिनं प्रेम केलं माझ्यावर, मुला-मुलीवर, ह्या वास्तुवर. बागेतली फुलं सुकली आहेत. त्याला ती फुल पाहुशी वाटेना. एकट्यानेच केलेला चहा, गार होतो आहे पण त्याला तो चहा पिऊशी वाटेना. स्वतःला सावरंत तो मंदिरात आला. विठ्ठल रखुमाईला मन भरुन पाहिलं. डोळे पानावल्याचे त्याला कळलंसुध्दा नाही. डोळे पुसले. पायरीवर येऊन बसला. कोवळं ऊनसुध्दा त्याला आनंद देऊ शकलं नाही. घरी आला. झोपाळ्यावर बसला. संपूर्ण घर मन भरुन पाहुन घेतलं. दोन महिन्यांपूर्वी पर्यंत हेच घर जीवंत वाटायचं. आज तर घराचा आत्माच नाहीय. स्वतः च्या डाव्या हातावर, त्याने स्वतःचाच उजवा हात ठेवला. आणि तो मोठमोठ्याने रडु लागला. भिंती निर्जीव असतात पण घर माणसांनी भरलेलं असलं की ते घर जीवंत असतं. का गेलीस मला सोडुन ? एकमेकांच्या सुख-दुःखात वाटेकरी होण्याचं वचन का मोडलंस? ह्या गुलाबी घरात मी एकटा कसा राहु ? तुझ्याशिवाय ह्या गुलाब घराला, सूर्योदयाला, एकट्याने मंदिरात जाण्याला, बागेतल्या गुलाब - जास्वंदीला काय अर्थ आहे ? माझ्या पाठिशी कायम होतीस खंबीरपणे उभी. मी एकटा कसा ऊभा राहु ? तूच सांगना - मी मुलाकडे अमेरिकेला जाऊ? की इथेच राहु ? माझ्या कोणत्याच प्रश्नाचं उत्तर तू देणार नाहीस हे माहित आहे गं मला. दोन महिन्यांपासून अनुभवतोय जीवनसाथी आपल्यापासून दूरावला की घर जीवंत राहात नाही. इच्छा असो वा नसो पण जगावंच लागतं. तुझ्या आठवणींसाठी, तुझ्यावरच्या ममत्वासाठी, लेक, सुन, जावई, नात, नातु ह्यांच्यासाठी जगावंच लागेल. मी करतो प्रयत्न मुला, मुलीची आई होण्याचा. नात, नातवाची आज्ञी होण्याचा. आई, आज्ञी होणं जमेल की नाही, माहीत नाही पण प्रयत्न तर करावाच लागेल. तू नोकरी न करण्याचा निर्णय घेतला होतास त्यावेळी मला तुझा राग आला होता पण मुलावर, मुलीवर सुसंस्कार केलेस, त्यांचा अभ्यास घेतलास, त्यांना खूप काळजी घेऊन घडवलंस, वाढवलंस. एक चांगला नागरिक म्हणून उभा केलंस. नातवाचं लग्न पाहण्याची तुझी इच्छा अपूर्ण राहिली. आपल्या सहजीवनाचा प्रवास खूपच चांगला झाला तो फक्त आणि फक्त तुझ्यामुळेच. मला सांभाळुन घेतलंस, मी चुकलो पण कधीच रागावली नाहीस. ममत्वानं समजावलंस.

व्यवसायातुन फारसं उत्पन्न मिळत नव्हतं पण तू हार मानली नाहीस. काटकसीने, सचोटीने संसार केलास. एकट्यानं आणखी किती दूरवर मला चालायचं माहित नाही. पण तू सोबत आहेस असं समजुन चालावंच लागणार आहे. त्याने रेडिओ लावला. गाणं ऐकु येऊ लागलं... जिंदगी और कुछ भी नही तेरी मेरी कहानी है.... मनातल्या मनात तो म्हणालाच जीवनसाथीचं अत्यंत चांगलं नातं निसर्गानं मनुष्यजन्मात निर्माण केलं आहे. आजपासून माझा आवडता रंग गुलाबी. झोपाळ्यावर बसुन एकटाच झोका घेऊ लागला. रुमालाने डोळ्यांतलं पाणी पुसु लागला.

(लेख क्र.५५१)

**- सुनील राऊत** माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर मो.९८२२७५८३८३

## हसा आणि शतायुषी व्हा!

बायको - दोन किलो वाटाणे घेऊ का?
नवरा - हो घे ना
बायको - तुझा सल्ला नाही मागितला रे, यासाठी विचारतेय की, तू इतके सोलू शकशील की नाही, का कमी घेऊ?

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* मलेशियास कोणत्या वर्षी स्वातंत्र्य मिळाले?
- ३१ ऑगस्ट १९५७

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

### बालकांचे आजार

प्राथमिक अवस्थेत वरील उपचार करावेत. बाळाच्या लक्षणांमध्ये फरक न झाल्यास तत्काळ तज्ज्ञ बालचिकित्सकाचा सल्ला व उपचार घ्यावेत. बाळाला अंगावरचे दूध सुरूच ठेवावे. त्यासोबत वरील जलसंजीवनी पण द्यावी. जलसंजीवनी चमचाने थोडी थोडी पण सारखी पाजत राहावी. यामुळे बाळाला हॉस्पिटलमध्ये दाखल करण्याचे टळू शकते. सहा महिन्यांच्या पुढील बाळाला भाज्यांचे पातळ सूप, भात-वरणाची पेज, तांदूळ आणि मूगडाळ खिचडी, फळांचा रस, कुस्करलेले फळ द्यावे. कमीत कमी दोन वर्षांपर्यंतच्या बालकांना पाणी उकळून गार करून दिले पाहिजे.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# आपल्या अहिल्यानगर शहरामधील बांधकाम क्षेत्रात आता प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंटची (इंजिनिअर) भूमिका आवश्यक










आपल्या नगर शहरामध्ये गेल्या काही वर्षांपासून उंच इमारती होत आहेत, FSI वाढल्या कारणाने छोट्या प्लॉटवर ७ ते ८ मजली बिल्डींग करता येतात. जेव्हा आपण उंच इमारती बांधतो तेव्हा खाली नमूद केलेल्या काही गोष्टी महत्वाच्या आहेत, जसे कि प्रोजेक्टचे टाइम टेबल, त्याची क्वॉलिटी, त्याचे कॉस्टिंग आणि बजेट, साईटवर लागणारी सेफ्टी या सर्व प्रोजेक्ट दर्जेदार होण्यासाठी कराव्या लागतात. यासाठी आपल्याला अनुभवी असा प्रोजेक्ट इंजीनिअर किंवा प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट नेमावा लागतो. सर्व प्रोजेक्ट त्याच्या देखरेखीखाली करावा, ज्याने प्रोजेक्ट वेळेत पूर्ण होईल व आवश्यक असणारी क्वॉलिटी मिळेल. या लेखामध्ये प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट (इंजीनिअर) ची भूमिका, त्याचा रोल याबद्दल माहिती दिली आहे.

**बांधकाम प्रकल्पांमध्ये प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट (इंजीनिअर) ची भूमिका**

बांधकाम प्रकल्प हे गुंतागुंतीचे असतात. हे प्रकल्प वेळेत आणि कॉस्ट इफेक्टिव पूर्ण व्हावेत, तसेच गुणवत्ता, सुरक्षितता आणि नियमांचे पालन होणे गरजेचे असते. यासाठी योग्य नियोजन, समन्वय आणि व्यवस्थापन आवश्यक असते. अशावेळी प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंटची भूमिका खूप महत्त्वाची ठरते. हे सल्लागार तज्ज्ञ मार्गदर्शन देऊन रिस्क हाताळणे, नियमांचे पालन करणे आणि प्रकल्प कार्यक्षमतेने पार पाडणे यासाठी मदत करतात. या लेखात प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट (PMC) यांच्या विविध भूमिका समजावून सांगितल्या आहेत – जसे की प्रकल्पाचे वेळापत्रक तयार करणे, delay and cost analysis करणे, गुणवत्तानियंत्रण, वेळेचे योग्य व्यवस्थापन, safety measures, dealing with risk आणि co ordination among all agency at site.

**बांधकाम उद्योगातील प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट (इंजीनिअर) ची भूमिका**

**प्रोजेक्ट वेळापत्रक तयार करणे (Project Scheduling)**

प्रोजेक्ट वेळेत आणि cost effective होण्यासाठी अचूकवेळा पत्रक आवश्यक असते. प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट बांधकाम टीमसोबत काम करून प्रत्येक टप्प्याचे तपशीलवार वेळापत्रक तयार करतात. संभाव्य विलंब आणि अडथळे ओळखून ते वेळेवर सुधारणा करतात. योग्यवेळी योग्य साधने आणि कामगार उपलब्धकरून देणे हाही वेळापत्रक व्यवस्थापनाचा भाग असतो.

**साईटवरील काम करणाऱ्या विविध एजन्सी मधील समन्वय** (Co ordination at site)

प्रोजेक्टवर काम करत असताना ज्या एजन्सी काम करत आहेत, त्यांच्यामध्ये समन्वय ठेवणे. आर्किटेक्ट, आरसीसी डिझायनर अथवा संबंधित एजन्सीने दिलेल्या ड्राईंगप्रमाणे आणि स्पेसिफिकेशन व गरजेप्रमाणे काम होते का, याकडे लक्ष ठेवणे.

ओनर अथवा विकसक, आर्किटेक्ट, आर सी सी डिझायनर, कॉन्ट्रॅक्टर, साईट इंजीनिअर्स, एम ई पी, कन्सल्टंट आणि प्रोजेक्टमध्ये सहभाग असलेल्या सर्व एजन्सी यांच्याशी समन्वय ठेवणे जेणेकरून कामात कुठल्याही अडथळ्याशिवाय सुसूत्रता येईल. तसेच काही अडचण असेल तर चर्चा करून मार्ग काढणे व त्या सोडवणे. पी एम सी कन्सल्टंट हा प्रोजेक्टमधील सर्व गोष्टींचे कॉर्डीनेशन करतो.

**विलंब आणि खर्चाचे विश्लेषण** (Dealy Cost analysis)

अनेकदा अनपेक्षित कारणांमुळे प्रकल्पात विलंब होतो किंवा खर्च वाढतो. सल्लागार अशा बाबींचे मूळ कारण शोधून उपाययोजना करतात. विलंब विश्लेषणात कोणत्या कामामुळे उशीर झाला, त्याचा संपूर्ण प्रकल्पावर काय परिणाम झाला, आणि वेळ वाचवण्यासाठी काय करता येईल यावर भर दिला जातो.

खर्च विश्लेषणात खर्च वाढण्याची कारणे शोधून, प्रकल्पाच्या नफा–तोट्यावर त्याचा काय परिणाम होतो हे पाहिले जाते आणि खर्च कमी करण्याच्या उपाययोजना ठरवतात.

**गुणवत्ता नियंत्रण** (Quality Control)

प्रकल्पातील कामकाज हे नियम, उद्योगमानके आणि ग्राहकांच्या अपेक्षांनुसार असावे लागते. प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट दर्जा नियंत्रणासाठी योजना तयार करतात, चाचण्या घेतात आणि नोंदी ठेवतात. ते वेळोवेळी कामाची तपासणी करून संभाव्य गुणवत्तादोष ओळखतात आणि त्यावर उपाय करतात.

**प्रकल्प वेळेत पूर्ण होण्यासाठी उपाय (Project timeline Optimization)**

प्रकल्प पूर्ण होण्यासाठी लागणारा कालावधी कमी करता येईल का, यासाठी प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट वेळापत्रकाचे विश्लेषण करतात. कोणती कामे एकाचवेळी होऊ शकतात किंवा जलदगतीने करता येतील का हे पाहतात. संसाधनांचा योग्य वापर करून वेळ आणि खर्च वाचवण्यासाठी ते काम करतात. यासोबतच 'डिझाईन–बिल्ड' किंवा 'कन्स्ट्रक्शन मॅनेजमेंट' अशा वेगवेगळ्या प्रकल्प पद्धतींचाही विचार केला जातो.

**सुरक्षिततेचे नियोजन (Safety Measures)**

बांधकाम स्थळांवर अपघाताचा धोका असतो. त्यामुळे सुरक्षिततेचे नियोजन Safety Management फार महत्त्वाचे असते. प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट योग्य सुरक्षा योजना तयार करतात – रिस्क ओळखणे, सुरक्षा प्रशिक्षण, आणि नोंदी ठेवणे हे त्यात समाविष्ट असते. ते वेळोवेळी सुरक्षा कामगारांचे निरीक्षण करतात आणि आवश्यक सुधारणा करतात.

**प्रोजेक्ट रिस्कहाताळणे** (dealing with Risk)

प्रत्येक प्रकल्पात अनेक प्रकारचे धोके असतात – जसे की डिझाईनमध्ये बदल, हवामानामुळे विलंब, कामगारांची कमतरता, पुरवठा साखळीतील अडथळे. प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट अशा रिस्क ओळखून त्याचे व्यवस्थापन करतात आणि पर्यायी योजना तयार करतात, जेणेकरून प्रकल्प वेळेत आणि esimated budget मध्ये पूर्ण होईल. योग्य प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट निवडताना लक्षात ठेवण्यासारख्या गोष्टी

**१. बांधकामक्षेत्रातील अनुभव**

तुमच्या प्रकल्पाच्या यशासाठी योग्य प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट निवडणे फार आवश्यक आहे. यासाठी पुढील बाबी विचारात घ्या:

**२. अनुभव आणि तज्ज्ञता (Expertise)**

प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंटची अनुभवी आणि परिणामकारक प्रोजेक्ट यशस्वीपणे पार पाडलेली पार्श्वभूमी असावी. त्यांचे मागीलकाम, ग्राहकांचे अभिप्राय, प्रमाणपत्रे आणि पात्रता याची खात्री करून घ्या.

**३. प्रोजेक्ट मॅनेजमेंटची पद्धत** (Project Management approach)

प्रत्येक प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंटची काम करण्याची पद्धत वेगळी असते. तुमच्या संस्थेच्या culture and values शी जुळणारी पद्धत असलेल्या प्रोजेक्ट मँनेजमेंट कन्सल्टंटची निवडकरा. उदाहरणार्थ, जर तुमच्या संस्थेत agile पद्धत महत्वाची असेल, तर त्याचा अनुभव असलेले प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट फायदेशीर ठरतील.

**४. बांधकाम क्षेत्रातील Knowledge**

सल्लागार सेवा तुमच्या उद्योगाची माहिती असलेली असावी. ज्या उद्योगात विशिष्ट नियम व कायदे लागू होतात – उदा. आरोग्य किंवा वित्तीय क्षेत्र रहिवास त्यासाठी अनुभव असलेले कन्सल्टंट फायदेशीरठरतात.

**५. संवाद आणि सहकार्य (Communication Collabration)**

चांगल`प्रोजेक्ट मँनेजमेंट कन्सल्टंट हे प्रामाणिकपणे संवाद साधणारे आणि तुमच्या टीमसोबत सहकार्य करणारे असले पाहिजेत. ते त्यांच्या प्रक्रियेबाबत पारदर्शक असावेत आणि नियमित अद्ययावत माहिती (daily progress report) देणारा असावा.

**६. खर्च आणि मूल्य (cost and value)**

प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट निवडताना खर्च महत्त्वाचा आहे, पण फक्त त्यावरच निर्णय घेऊ नये. त्यांच्या अनुभव, तज्ज्ञता आणि प्रकल्प यशस्वी करण्याची क्षमता यावरही मूल्यांकन केले पाहिजे. केवळ स्वस्त सेवा घेतल्याने दीर्घकालीन नुकसान होऊ शकते.

**निष्कर्ष** –बांधकाम प्रकल्प हे गुंतागुंतीचे (complex) आणि कठीण असतात. त्यामुळे प्रभावी प्रकल्प व्यवस्थापनासाठी प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंटची मदत अत्यावश्यक आहे. हेकन्सल्टंट वेळापत्रक, खर्चाचे नियोजन, गुणवत्ता, सुरक्षितता आणि रिस्क हाताळण्यास मदत करतात. योग्य प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट निवडल्यास प्रकल्प वेळेत, खर्चमर्यादेत आणि अपेक्षित गुणवत्तेसहपूर्ण होतो.

**संदेश** – नवीन इंजीनिअर्स यांनी expert होणे गरजेचे आहे यासाठी बांधकाम क्षेत्रात येणारे नवीन तंत्रज्ञान (Technology) नवीन मटेरीअल या सर्व गोष्टींशी अवगत राहणे गरजेचे आहे. आपण Project within time, cost effective and quality चा व्हावा यासाठी लागणाऱ्या गोष्टींचा study करणे आवश्यक आहे. शक्य असल्यास मोठ्या कंपन्या मध्ये काही अनुभव घ्यावा ज्याने लहान मोठे प्रकल्प करताना आपला लेपषळवशपलश चांगला वाढेल व आपण पुढे उत्तम दर्जाचे काम करू शकाल.

**आमच्या फर्मविषयी** – मी आदिनाथ दहिफळे गेल्या १२ वर्षा पासून नगर शहरामध्ये आणि बाहेर प्रोजेक्ट मॅनेजमेंटची कामे करतो. नगर शहरामध्ये पहिली ११ मजली अपार्टमेंट माझ्या कन्सल्टन्सी खाली झाली तसेच आता १६ मजली अपार्टमेंट आम्ही पूर्ण करत आहोत. नगर शहर व शहराबाहेर अनेक प्रकल्प आम्ही केलेले आहे. मी माझे काम Spectrumconstrotech या फर्मद्वारे करतो.



**इंजिनिअर – आदिनाथ दहिफळे** Mobile : 9975634224
(AES President) Spectrumconstrotech
BE (Civil) , M. Tech Civil (IIT Mumbai) ,
Chartered Engineer, M. Tech Valuation
G 6, Saikunj Apt, Gulmohar road, savedi,
Ahilyanagar 414003.
Email ID -Adinath04@gmail.com
Web : www.spectrumconstrotech.com

आर्किटेक्टस, इंजिनिअर्स ॲण्ड सर्व्हेअर्स असोसिएशन, अहिल्यानगर
www.aesanagar.com
AESA

## दहावीच्या परीक्षेत आलिया सय्यदला ९३%



नगर – सेक्रेट हार्ट कॉन्व्हेंट शाळेची विद्यार्थिनी आलिया सय्यद ही मार्च २०२५ मध्ये झालेल्या दहावी बोर्डाच्या परीक्षेत ९३ टक्के गुणांनी उत्तीर्ण झाली. तिला शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

आलिया ही अहमदनगर येथील एसटी विभागात वेहिकल एक्झामिनर आबीद सय्यद यांची मुलगी आहे.

# रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा आहे : सलीमखान पठाण

## शिक्षकांच्यावतीने अल करम हॉस्पिटलला साडेसहा लाखाची देणगी



अल करम हॉस्पिटलला शिक्षकांच्या वतीने साडेसहा लाखाच्या देणगीचा धनादेश देताना सलीमखान पठाण आदी.

नगर – आजारी व पिडीत रुग्णांची सेवा करून मनाला शांती प्राप्त होते त्यामुळे रुग्णसेवा ही एक प्रकारची ईश्वर सेवा आहे. प्रत्येक शिक्षकाने आपल्या शैक्षणिक कार्याबरोबरच सामाजिक कार्यातही आपल्या परीने योगदान द्यावे. आपण मशिदी व मदरसे यांना नेहमीच दान देत असतो परंतु रुग्णसेवेसाठी कार्य करणाऱ्या रुग्णालयांना देखील मदत करण्याची आवश्यकता आहे. त्यातून देखील पुण्य प्राप्त होते असे प्रतिपादन अहमदनगर जिल्हा उर्दू साहित्य परिषदेचे जिल्हाध्यक्ष व शिक्षक बँकेचे माजी चेअरमन सलीमखान पठाण यांनी केले.

शहरातील अल करम हॉस्पिटल या सेवाभावी वृत्तीने चालविल्या जाणाऱ्या हॉस्पिटलसाठी जिल्ह्यातील उर्दू शिक्षकांच्या वतीने पाच लाख ९० हजार रुपये तसेच उर्दू साहित्य परिषदेचे जिल्हा उपाध्यक्ष के के खान यांचे तर्फे ७५ हजार रुपये असे सहा लाख ६५ हजार रुपयाची देणगी नुकतीच देण्यात आली. त्यावेळी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून पठाण बोलत होते.

जिल्हा परिषदेचे माजी शिक्षण विस्तार अधिकारी दिवंगत रमजान पठाण यांच्या पुढाकारातून कोरोना काळामध्ये जिल्ह्यातील उर्दू शिक्षकांनी एक निधी गोळा केला होता. वैद्यकीय क्षेत्र साठीच त्याचा वापर व्हावा ही भावना त्यासाठी होती. कोरोना पूर्ण संपला परंतु काही कारणास्तव हा निधी खर्च करता आला नाही. अल करम हॉस्पिटलमध्ये उभारण्यात येणाऱ्या आयसीयु सेंटरसाठी आता हा निधी देण्यात आला आहे. रमजान पठाण यांच्या पुढाकारातून उपक्रम झाल्याने सदर आयसीयू सेंटरला 'रमजान पठाण आयसीयु सेंटर' असे नाव देण्याचे देखील यावेळी जाहीर करण्यात आला. भविष्यातही जिल्ह्यातील शिक्षक या हॉस्पिटलला निश्चितपणे मदत करतील असे आश्वासन देखील पठाण यांनी यावेळी दिले.

याप्रसंगी रहमत सुलतान फाउंडेशनचे अध्यक्ष युनूसभाई तांबटकर, निसार बागवान, उर्दू साहित्य परिषदेचे सचिव आबिद दुल्हेखान, मुख्याध्यापक संघाचे माजी अध्यक्ष शरफुद्दीन शेख, माजी शिक्षण विस्तार अधिकारी नवेद मिर्झा, अलीम शेख, अश्फाक शेख, सहेली ग्रुपच्या प्रमुख नर्गिस इनामदार, समीना शेख, बदर शेख, शाकीर शेख, हनीफ शेख, इमाम सय्यद, अनिस शेख, हारुण कुरेशी, साजिद कुरेशी, तौसिफ शेख, सदाकत हुसेन, सलीम शेख, संस्थेचे डॉ.जहीर मुजावर, डॉ. अशपाक पटेल, तौफिक तांबोळी, शेर अली शेख, शाहनवाज तांबोली, इमरान भाईजान, समीर सय्यद, शाहिद सय्यद, एजाज तांबोळी, अर्शद सय्यद, राजीक खान आदी उपस्थित होते.

प्रस्ताविक भाषणात फयाज शेख यांनी या कार्यक्रमा मागचा उद्देश विशद केला. डॉ. जहीर मुजावर व डॉ. अशपाक पटेल यांनी हॉस्पिटलच्या कामकाजाची माहिती उपस्थितांना दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन फय्याज सर यांनी केले. हनिफ सर यांनी आभार मानले.



डॉ.विखे पाटील अभियांत्रिकीतील मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागामधील २८ विद्यार्थ्यांची कॅम्पसद्वारे नोकरीसाठी निवड करण्यात आली. (छाया – विजय मते)

# डॉ. विखे पाटील अभियांत्रिकीतील मेकॅनिकल इंजिनिअर विभागातील २८ विद्यार्थ्यांची कॅम्पसद्वारे नोकरीसाठी निवड

नगर – विळद घाट येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयातील ट्रेनिंग अँण्ड प्लेसमेंट विभागामार्फत मेकॅनिकल इंजिनिअर विभागातील विद्यार्थ्यांकरीता करीअर घडवण्याच्या दृष्टीने एकुण ७ कंपन्यांद्वारे चतुर्थ वर्ष मेकॅनिकल इंजिनिअर विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या. या मुलाखती दरम्यान विद्यार्थ्यांची प्रथम योग्यता चाचणी घेण्यात आली. त्यानंतर तांत्रिक चाचणी आणि प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे मेकॅनिकल इंजीनियरिंग विभागातील एकुण २८ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

वैष्णवी अशोक शिंदे हिची पुणे येथील किर्लोस्कर न्यूमॅटिक या कंपनीत निवड होऊन सर्वात मोठे पॅकेज मिळाले. याबाबत ती म्हणाली ही गोष्ट माझ्यासाठी गौरवास्पद आहे. त्याप्रमाणे डॉ. विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालया मधील मेकॅनिकल विभागासाठी अभिमानाची देखील बाब आहे. माझ्या यशामध्ये आई–वडील कॉलेजचे प्राचार्य, प्राध्यापक, विभाग प्रमुख, प्लेसमेंट ऑफिसर यांचे मार्गदर्शन लाभल्याने मी यश मिळवू शकले.

पुणे येथील साऊथर्न ग्लोबल सर्विसेस, सी ए इ सोल्युशन, क्यू एच स्टालब्रो, ए पी टॉम तर अहिल्यानगर येथील वांबोरी मधील के एस बी पॅम्प, लेअर्स सोलर पी व्ही सिस्टीम या मॅकेनिकल क्षेत्रातील अग्रगण्य कंपन्यांचा समावेश आहे. या विद्यार्थ्यांना सरासरी चार लाख आणि कमाल साडेसहा लाख रुपयांचे वार्षिक पॅकेज देण्यात आले आहे.

या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.सुजय विखे पाटील, संस्थेचे डायरेक्टर जनरल प्रशासन डॉ. पी.एम.गायकवाड, डायरेक्टर–टेक्निकल प्रा.सुनिल कल्हापुरे व प्राचार्य डॉ.उदय नाईक, मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभाग प्रमुख डॉ. रविंद्र नवथर, ट्रेनिंग अँण्ड प्लेसमेंट ऑफीसर प्रा.सुदर्शन दिवटे, विभागीय शिक्षक समन्वयक प्रा.दत्तात्रय नन्नवरे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन त्यांच्या उज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# श्री संदीपनी अ‍ॅकॅडमीत पालक सभा आणि शैक्षणिक मेळाव्याचे आयोजन

## अनेक उपक्रमांचे उद्‌घाटन




श्री संदीपनी अ‍ॅकॅडमीत पालक सभा आणि शैक्षणिक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

नगर – श्री संदीपनी अ‍ॅकॅडमी, अहमदनगर यांच्यावतीने JEE/NEET/CET २०२५–२७ बॅचेससाठीचा पालक मेळावा व शैक्षणिक कार्यक्रम १८ मे रोजी संजोग लॉन्स, सवेडी येथे पार पडला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे पद्मश्री पोपटराव पवार, राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कारप्राप्त प्राचार्य प्रा. सुनील पंडित, तसेच प्रवीण जगी प्रभु व विलासानी गोपी माताजी तसेच श्री संदीपनी अ‍ॅकॅडमीचे संचालक डॉ. के. बालराजू, राहुल गुजराल, नानासाहेब बऱ्हाटे यांच्या प्रमुख उपस्थितीत विविध शैक्षणिक उपक्रमांचे उद्‌घाटन झाले.

मुख्य आकर्षण बिंदू: "Success Blueprint for IIT-JEE, NEET, CET" या डॉ. के. बालराजू लिखित पुस्तकाचे प्रकाशन. या पुस्तकाचे प्रकाशन पद्मश्री पोपटराव पवार, प्राचार्य सुनील पंडित, प्रवीण जगी प्रभु आणि माताजी यांच्या हस्ते पार पडले.

**२४ X ७ डाऊट मास्टर प्लॅटफॉर्म** – १००+ विषयतज्ज्ञ शिक्षक ९० सेकंदांत थेट लाईव्ह शंका निरसनासाठी उपलब्ध. या अभिनव प्लॅटफॉर्मचे उद्‌घाटन श्रीमती मोनिका कारी, डायरेक्टर, श्री संदीपनी अ‍ॅकॅडमी व डॉ. के. बालराजू यांच्या शिक्षण मिशनमागील आधारस्तंभ यांच्या हस्ते झाले.

**'उडान प्रोजेक्ट'** – इयत्ता ६ वी ते १०वी साठी २२० गरजू विद्यार्थ्यांसाठी १००% मोफत शिक्षण, राधा–कृष्ण आगमन महोत्सवानिमित्त. या लोकोपयोगी प्रकल्पाचे उद्‌घाटन सुनिता पुष्पराज सोलंके माताजी यांच्या हस्ते करण्यात आले.

**'लक्ष्य बॅच'** – CET व JEE Mains साठी विशेष अभ्यासक्रम व मार्गदर्शन केंद्राचे उद्‌घाटन. या उपक्रमाचे उद्‌घाटन पूजा नानासाहेब बऱ्हाटे माताजी यांच्या हस्ते पार पडले, त्या डायरेक्टर नानासाहेब बऱ्हाटे सरांच्या खंबीर समर्थक आहेत.

**मोफत डिजिटल ई–लायब्ररी** – शैक्षणिक व्हिडीओ, ई–बुक्स व अभ्यास साहित्यांसह विद्यार्थ्यांसाठी खुली. या उपक्रमाचे उद्‌घाटन विलासानी गोपी माताजी यांच्या हस्ते झाले.

या कार्यक्रमात डॉ. के. बालराजू यांनी पालक व विद्यार्थ्यांसोबत संवाद साधून करिअर मार्गदर्शन केले. सुमारे ६०० विद्यार्थी व पालक यांनी कार्यक्रमाला प्रतिसाद दिला. कार्यक्रमानंतर भोजन व्यवस्था करण्यात आली होती.



विचार भारती व जनसेवा फाउंडेशन आयोजित राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धांच्या अंतिम फेरीचे उद्‌घाटन करताना महोत्सवाच्या स्वागताध्यक्षा धनश्री विखे.

# ‘विचार भारती’ व ‘जनसेवा’च्या उपक्रमांमधून अहिल्यादेवींच्या विचारांचा जागर : धनश्री विखे

## राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धांच्या अंतिम फेरीस प्रतिसाद

नगर – अहिल्यादेवी या आपल्या जिल्ह्याच्या सुपुत्री असल्याने जिल्ह्याचे नामांतर अहिल्यानगर झाल्याचा अभिमान सर्वांना आहे. त्यामुळे त्यांचे विचार व कार्य आत्मसात करून त्यावर वाटचाल करणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. विचार भारती व जनसेवा फाउंडेशनच्यावतीने अहिल्यादेवींनी केलेलं महान कार्य सर्वांपर्यंत जावे यासाठी विविध उपक्रमाचे आयोजन केले आहे. या विविध उपक्रम व स्पर्धांमधून अहिल्यादेवींच्या विचारांचा जागर होत आहे, असे प्रतिपादन सांस्कृतिक महोत्सवाच्या स्वागताध्यक्षा धनश्री विखे यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त अहिल्यानगर गौरव दिन व पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सवा अंतर्गत घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धांच्या अंतिम फेरीचे उद्‌घाटन प्रसंगी सौ. विखे बोलत होत्या. अध्यक्षस्थानी जिल्हा मराठा विद्या प्रसारक मंडळाचे सचिव ॲड.विश्वासराव आठरे होते. यावेळी महोत्सवाचे कार्याध्यक्ष राजेंद्र पाचे, विचार भारतीचे उपाध्यक्ष अनिल मोहिते, न्यू आर्टस् महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बाळासाहेब सागडे, विचार भारतीचे मार्गदर्शक रवींद्र मुळे, महोत्सवाचे सचिव अशोक गायकवाड, उपाध्यक्ष निखील वारे व धनंजय जाधव, निमंत्रक बाबासाहेब वाकळे, चंद्रकांत तागड आदी उपस्थित होते.

ॲड.विश्वासराव आठरे म्हणाले, आपल्याला देशाचा इतिहास हा पुस्तकातून शिकवला जात होता. पण सध्याची पुस्तके पहाता हा जुना इतिहास पुस्तकांमधून पुसला गेला आहे. नव्या पिढीला आपल्या महापुरुषांची नावेही माहिती नाहीत हे दुर्दैव. आपली संस्कृती सोडून मुल परकीयांचे अनुकरण करत असल्याने त्यांना मार्गदर्शन होणे आवश्यक आहे. त्यामुळे आपला इतिहास, संस्कृती पुन्हा सर्वांपुढे आणण्यासाठी विचार भारती व जनसेवा फाउंडेशनचे असे समाजोपयोगी उपक्रम कायम स्वरूपी होणे ही काळाची गरज आहे. सध्याच्या घटना पहाता समाजात वैचारिक सुधारणा होणे आवश्यक आहे. समाज सुधारण्याचेच काम करत असल्याने सर्व समाजांनी त्यांच्या उपक्रमांना साथ द्यावी, असे आवाहन केले.

प्रास्ताविकात स्पर्धेचे संयोजक विशारद पेटकर यांनी माहिती दिली. अनिल मोहिते यांनी सांस्कृतिक महोत्सवातील कार्यक्रमांची माहिती दिली. अशोक गायकवाड यांनी विचार भारतीच्या उपक्रमांची माहिती दिली.

प्रा.ऐश्वर्या सागडे यांनी सूत्रसंचालन केले. स्पर्धा संयोजक प्रा.अशोक सागडे यांनी आभार मानले. यावेळी विविध जिल्ह्यातून आलेले सहभागी स्पर्धक उपस्थित होते.

# पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकरांचे विचार समाजासाठी ‘प्रेरणादायी व आदर्शवत’

## अक्षय कर्डिले यांचे प्रतिपादन; नगर दक्षिण भाजपाच्यावतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन



राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशताब्दी दिनानिमित्त नगर दक्षिण भाजपाच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. (छाया – लहू दळवी)

नगर – राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचे विचार समाजाला प्रेरणादायी व आदर्शवंत आहे. त्यांचा प्रसार व प्रचार व्हावा यासाठी समाजामध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन होणे गरजेचे आहे. राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचा जन्म आपल्या जिल्ह्यामध्ये झाला असून त्यांचे नाव देखील आपल्या जिल्ह्याला दिले आहे. नगर दक्षिण भाजपाच्या वतीने २६ मे रोजी सकाळी १० वाजता सहकार सभागृह येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती भाजपाचे युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अक्षय कर्डिले यांनी दिली.

राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशताब्दी दिनानिमित्त नगर दक्षिण भाजपाच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून नियोजनाच्या बैठकीत बोलताना अक्षय कर्डिले, जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, बाजार समितीचे सभापती भाऊसाहेब बोठे, उपसभापती रभाजी सुळ, दादाभाऊ चितळकर, अण्णासाहेब बाचकर, मधुकर मगर, संतोष म्हस्के, रेवणनाथ चोभे, राम पानमाळकर, डी. आर. शेंडगे, सुधीर भापकर, बाबासाहेब खडसे, दीपक कार्ले, दादा दरेकर, सुभाष निमसे, भैय्या लांडगे, हर्षल म्हस्के, गणेश भालसिंग आदी उपस्थित होते.

राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशताब्दी दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कर्जत तालुक्यातील चोंडी येथे ३१ मे रोजी उपस्थित राहणार आहे, अशी माहिती अक्षय कर्डिले यांनी दिली.

नगर दक्षिण भाजपाच्यावतीने राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त समाजामध्ये चांगले काम करणाऱ्या महिलांचा सन्मान केला जाणार आहे. तसेच दहावी बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा स्पर्धा परीक्षेतील विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा गावाच्या विकासासाठी योगदान असणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार सोहळा होणार असल्याची माहिती दिलीप भालसिंग यांनी दिली.

# विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासासाठी नवे अभ्यासक्रम अहिल्यानगरमध्ये लवकरच सुरु करू

## पुणे विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरु पराग काळकर यांचे प्रतिपादन

नगर – नव्या शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य विकास वाढविण्यासाठी ॲप्रेंटिसशिप एम्बेडेड डिग्री प्रोग्रॅम ही नवी संकल्पना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंमलात आणत आहे. ही संकल्पना अहिल्यानगरमध्ये राबवण्यासाठी पुणे विद्यापीठ व उद्योजकांची झालेल्या बैठकीत काही महत्वाच्या विषयांवर सकारात्मक चर्चा झाली आहे. अहिल्यानगरमध्ये लवकरच विद्यार्थ्यांसाठी काही चांगले कौशल्य विकासाचे नवे अभ्यासक्रम उद्योजकांना बरोबर घेऊन सुरु करण्याच्या दृष्टीने पुढे वाटचाल झाली आहे. यामध्ये सीए असोसिएशनच्या सहकार्याने वाणिज्य अभ्यासक्रमात आर्टिकलशिपचा समावेश करता येणार आहे. तसेच सायन्स विभागात बीएससी कॉलिटी ॲशूरन्स अभ्यासक्रम व नागरी बँकांना लागणारे कौशल्य मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी अभ्यासक्रचा समावेश करण्यात येणार आहे. या नव्या संकल्पनेमुळे अहिल्यानगर मधील विद्यार्थ्यांमधील अकुशलता कमी होण्यासाठी निश्चितच होण्यास मदत होईल, असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरु पराग काळकर यांनी केले.



अहिल्यानगरमधील उद्योजक व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संयुक्त बैठकीत प्रभारी कुलगुरू पराग काळकर यांचा सत्कार करताना आमी संघटनेचे अध्यक्ष जयद्रथ खाकाळ.

हिंद सेवा मंडळाचे संचालक व उद्योजक अनंत देसाई यांच्या पुढाकारातून नव्या शैक्षणिक धोरणानुसार औद्योगिक क्षेत्रास कौशल्य युक्त आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध व्हावे यासाठी अहिल्यानगर मधील उद्योजक व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांना एकत्रित आणण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. त्याचाच पुढील टप्प्यात पराग काळकर यांच्या समवेत गुरुवारी एमआयडीसी मधील उद्योजक व शैक्षणिक संस्थांची बैठक झाली. यावेळी विद्यापीठाचे समन्वयक प्रा.डॉ.देविदास गोल्हार, आमी संघटनेचे अध्यक्ष जयद्रथ खाकाळ, सारडा महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित, विखे अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.उदय नाईक आदींसह उद्योजक, कारखानदार, शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधी, महाविद्यालयांचे प्राचार्य उपस्थित होते.

बैठकीचे संयोजक अनंत देसाई प्रास्ताविकात म्हणाले, अहिल्यानगरचे औद्योगिक क्षेत्र आता वाढत आहे. नव्या डिजिटल युगात कंपन्यांना तंत्रज्ञान युक्त कुशल कामगार मिळावा यासाठी गेल्या वर्षापासून प्रयत्नशील आहे. यासाठी पुणे विद्यापीठाकडे पाठपुरावा करून कुलगुरू, प्रभारी कुलगुरु व नगरचे उद्योजक यांची सांगड घातली आहे. या प्रयत्नांना आता यश येत असून लवकरच नव्या अभ्यासक्रमाची निर्मिती होणार आहे. नगरमधील सर्व उद्योजक फुले विद्यापीठाच्या या नव्या संकल्पनेस पूर्ण सहकार्य करणार आहे.

यावेळी सीए असोसिएशनचे अध्यक्ष प्रसाद पुराणिक व सनित मुथा, राजेंद्र कटारिया, उद्योजक संजय बंदिष्टी, अरुण कुलकर्णी यांनी काही सूचना करत मुद्दे उपस्थित केले. त्यांचे विद्यापीठाचे समन्वयक प्रा.डॉ.देविदास गोल्हार यांनी सकारात्मक समाधान केले.

यावेळी सिनेट सदस्य अमोल घोलप, स्नायडर इलेक्ट्रिक कंपनीचे संतोष माणकेश्वर, श्रीकांत गाडे, दौलत शिंदे, राजेश देशपांडे, दिलीप अकोलकर, मिलिंद गंधे, अविनाश बोपर्डीकर, प्रवीण बजाज, चिन्मय सुखटणकर, सारडा कॉलेजचे प्रबंधक अशोक असेरी आदी उपस्थित होते.

# महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र आणि अहमदनगर महाविद्यालयांत सामंजस्य करार

नगर – अहमदनगर महाविद्यालय, अहिल्यानगर व महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र, कोल्हापूर यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नोएल पारगे आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राचे अध्यक्ष यशवंत शितोळे यांनी स्वाक्षऱ्या केल्या.



अहमदनगर महाविद्यालय, अहिल्यानगर व महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र, कोल्हापूर यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे.

या कराराच्या माध्यमातून ‘करिअर कट्टा’ उपक्रम ंतर्गत ग्लोबल गर्जे मराठी, करिअर संधींची महामेळावा यांसारख्या विद्यार्थी केंद्रित उपक्रमांचा विस्तार करण्यात येणार असून, नवीन शैक्षणिक धोरणांची प्रभावी अंमलबजावणी केली जाणार आहे.

पुणे विभागातील करिअर कट्टा संलग्नित महाविद्यालयांची सहविचार सभा पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या अण्णासाहेब मगर महाविद्यालय, पुणे येथे पार पडली. या सभेचे उद्‌घाटन यूजीसी एम.एम.टी. टी.सी.चे संचालक डॉ. संतोष केंद्रे यांच्या हस्ते झाले. यावेळी अण्णासाहेब मगर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे, अहिल्यानगर दक्षिणचे प्राचार्य डॉ. सतीशचंद्र सूर्यवंशी, नगर उत्तरचे प्राचार्य डॉ. राजधर टेमकर, विभागीय समन्वयक डॉ. संजय खिल्लारे, प्राचार्य भाऊसाहेब देशमुख, जिल्हा समन्वयक प्रा. नवनाथ नागरे, तसेच डॉ. भागवत परकाळ यांची उपस्थिती होती.

अहमदनगरमहाविद्यालयातील जिल्हास्तरावरील विद्यार्थी संसदेचे पदाधिकारी अश्विनी ढोकणे आणि अर्जुन गहिले यांचाही या कार्यक्रमात सहभाग होता. या करारामुळे विविध देशातील मराठी उद्योजकांचा मार्गदर्शन लाभ अहमदनगर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मिळणार असल्याची माहिती जिल्हा समन्वयक डॉ. भागवत परकाळ यांनी दिली.

या उपक्रमास भा.पां हिवाळे संस्थेचे अध्यक्ष डॉ. आर.जे. बार्नबस, उपप्राचार्य प्रा. दिलीपकुमार भालसिंग, विनाअनुदान विभाग समन्वयक डॉ. सय्यद रज्जाक, उपप्राचार्य प्रीतमकुमार बेदरकर, रजिस्ट्रार कल्पलता भिंगारदिवे यांनी शुभेच्छा दिल्या.



## भाग्योदय विद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात

भाग्योदय माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाच्या इयत्ता दहावी २००९–१० ची बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा भाग्योदय विद्यालय केडगाव येथे उत्साहात झाला. यावेळी प्राचार्य ज्ञानदेव बेरड, बाबासाहेब कोतकर, संजय गोसावी, सतीश मुसळे, अशोकराव हराळ उपस्थित होते. यावेळी शाळेच्या माजी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले व पंधरा वर्षांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला व शाळेविषयी कृतज्ञता व्यक्त केली.



## हज यात्रेस जाणाऱ्या यात्रेकरूंचा राब्ते–रिश्ते–नाते ट्रस्टतर्फे सत्कार

यावर्षी हज यात्रेस जाणाऱ्या नासीर हाजी इस्माईल खान, असीर हाजी इस्माईल खान आणि तस्लीम नासीर खान यांचा शकील चौधरी रिश्ते–नाते ट्रस्टतर्फे अध्यक्ष हाजी शेख खलील यासीन चौधरी यांनी सत्कार केला. यावेळी अकिल खलील चौधरी, हज्जन खतीजा हाजी इस्माईल खान, रेशमा इरफान खान उपस्थित होते.

# खा.निलेश लंके प्रतिष्ठानच्यावतीने २५ मे रोजी रायरेश्वर गडावर स्वच्छता मोहिमेचे आयोजन



नगर – छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांच्या राज्यातील गड कोटांचे संवर्धन व स्वच्छता मोहीमेअंतर्गत २५ मे रोजी पुणे जिल्ह्यातील रायरेश्वर किल्ल्यावर स्वच्छता व संवर्धन मोहिम राबविण्यात येणार आहे. खा. निलेश लंके यांच्या संकल्पनेतेतील या मोहीमेतील हा तिसरा किल्ला असून त्यासाठी स्वयंसेवक शनिवारी (२४ मे) सायंकाळी किल्ल्याकडे प्रस्थान करणार आहेत.

१० मार्च रोजी खा. निलेश लंके यांनी त्यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून राज्यातील गड कोटांचे संवर्धन व स्वच्छता मोहिम हाती घेण्याची घोषणा करून मार्च महिन्यामध्येच १६ मार्च रोजी शिवजन्मभुमी शिवनेरीपासून या मोहिमेचा श्रीगणेशा करण्यात आला होता. एप्रिल महिन्यात छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मृती जतन करणाऱ्या श्रीगोंदा तालुक्यातील पेडगांव येथे धर्मवीर गडावर दुसरी स्वच्छता व संवर्धन मोहिम राबविण्यात आली. निलेश लंके प्रतिष्ठानचे सभासद तसेच शिवप्रेमी असे हजारो मावळे या मोहिमांमध्ये सहभागी झाले होते.

दोन यशस्वी मोहीमांनंतर आता जिथे छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची शपथ घेतली त्या पुणे जिल्ह्यातील भोर येथील रायरेश्वर गडावर स्वच्छता मोहिम राबविण्यात येणार आहे. या मोहीमेसाठीही हजारो शिवप्रेमी तसेच निलेश लंके प्रतिष्ठानच्या सभासदांनी ऑनलाईन नोंदणी केली आहे.

### खा. लंके यांचा गडावर मुक्काम

या मोहिमेच्या निमित्ताने खासदार निलेश लंके हे शनिवारी सायंकाळीच रायरेश्वर गडावर हजेरी लाऊन तिथेच मुक्काम करणार आहेत. गडावरील सभामंडपात ते विश्रांती घेऊन सकाळी सात वाजता सुरू होणाऱ्या स्वच्छता व संवर्धन मोहीमेत सहभागी होणार आहेत. गडावर मुक्काम करणारे खा. निलेश लंके हे पहिलेच लोकप्रतिनिधी ठरणार आहेत.

### मोहीमेसाठी बसची व्यवस्था

या मोहीमेत सहभागी होणाऱ्या मावळ्यांसाठी अहिल्यानगर व पारनेर येथून बसेसची व्यवस्था करण्यात आली आहे. अहिल्यानगर–सुपा–पारनेर–शिरूर–तळेगांव ढमढेरे–अष्टापूर–उरूळीकांचन–सासवड–नारायणपुर–कापुरहोळ–भोर–रायरेश्वर गड या मार्गाने बसेस जाणार आहेत. शनिवारी सायंकाळी ६ वाजता नगर येथून तर सायंकाळी ७ वाजता पारनेर येथून बसेस प्रस्थान करतील व भोर येथे मुक्कामी जातील.

### मोहिमेत भोजन, नाश्त्याची सोय

मुक्कामाच्या ठिकाणी शनिवारी रात्रीचे जेवण, रविवारी सकाळचा नाश्त्याची तसेच दुपारच्या जेवणाची निलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने व्यवस्था करण्यात आली असल्याचे सांगण्यात आले. मुक्कामासाठी आंथरूण, पांघरूण, हलके ब्लँकेट, मुक्कामाच्या कालावधीसाठी हवामानाच्या स्वरूपानुसार पुरेसे कपडे, आरामदायक पोषाख, रेनकोट, स्वतःची औषधे सोबत घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# इमारत कंपनीच्या चेअरमनपदी रवींद्रभाई गुजराथी यांची निवड



नगर – नुकत्याच झालेल्या संचालक मंडळाच्या सभेमध्ये अहिल्यानगर शहरातील कापड बाजार लगत असलेल्या इमारत कंपनी लिमिटेडच्या चेअरमनपदी रवींद्र नटवरदास गुजराथी यांचे बिनविरोध निवड करण्यात आली.

सदर इमारत कंपनीची स्थापना स्वातंत्र्यपूर्वकाळात १८९१ रोजी झाली होती. याच इमारत कंपनीच्या प्रांगणामध्ये लोकमान्य टिळकांचा पुतळा असून येथे झालेल्या लोकमान्य टिळकांच्या सभेत त्यांनी ‘स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच’ अशी घोषणा केली होती.

रवींद्र गुजराथी हे श्री रामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशन आणि रामकृष्ण सेवा ट्रस्ट या दोन संस्थांचे विश्वस्त म्हणून काम पाहत आहेत. यापूर्वी ते आडते बाजार मर्चंट असोसिएशनचे सुद्धा पदाधिकारी होते.


# कत्तलीसाठी गोवंशीय जनावरांची वाहतूक करणारा टेम्पो पकडला

नगर – गोवंशीय जनावरांची कत्तल करण्याच्या उद्देशाने वाहतूक करणारा टेम्पो एमआयडीसी पोलिसांनी पकडून ३ गोवंशीय जनावरांची सुटका केली. ही कारवाई छत्रपती संभाजीनगर रोडवरील जेऊर येथील बायजामाता टेकडी समोर २२ मे रोजी सायंकाळी सात वाजता केली. एमआयडीसी पोलिसांना मिळालेल्या माहितीवरून पोलिस जेऊर बायजाबाई येथे गेले असता त्यांना टाटा कंपनीचा टेम्पो (क्र. एम एच १७ ए जी ३१८८) हा येताना दिसला टेम्पोचा संशय आल्याने पोलिसांनी टेम्पो थांबवला. पोलिसांना पाहताच टेम्पो चालक टेम्पो तेथेच सोडून पसार झाला. पोलिसांनी टेम्पोची पाहणी केली असता टेम्पोच्या हौद्यामध्ये ५ हजार रुपये किमतीची एक गावरान गाय, ४ हजार रुपये किमतीचे गावरान गाईचे २ वासरु (किंमत प्रत्येकी २ हजार) सुमारे १ लाख रुपये किंमतीचा टेम्पो असा मुद्देमाल जप्त केला.

एमआयडीसी पोलीस ठाण्यात अविनाश सतीश सरोदे (वय २५ रा. वाळुंज पारगाव, ता.नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन टेम्पो चालक भाऊसाहेब गिते याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आहे.




# तरुणांमध्येही 'व्हेरिकेज व्हेन्स'ची समस्या



अलिकडे तरुणांमध्येही 'व्हेरिकोज व्हेन्स'चं प्रमाण वाढताना दिसत आहे. यामध्ये रुग्णांचे पाय दुखणं, जडपणा येणं ही लक्षणं जाणवतात आणि पायाच्या शिरा फुगलेल्या दिसून येतात. बैठी जीवनशैली, तासन् तास एकाच स्थितीत बसून करावं लागणारे काम, सतत उभं राहावं लागणं, व्यायामाचा अभाव, लठ्ठपणा, गर्भधारणा आणि जागरूकतेचा अभाव, ही 'व्हेरिकोज व्हेन्स'ची प्रमुख कारणं आहेत. वेळीच उपचार केले नाहीत, तर यामुळे अल्सर किंवा शिरा फुटण्यासारख्या गंभीर गुंतागुंती निर्माण होऊ शकतात.

**'एंडोव्हेनस लेसर थेरपी'**

'एंडोव्हेनस लेसर थेरपी' सारख्या आधुनिक आणि 'मिनीमली इन्व्हेसिव्ह' तंत्रांचा वापर करून व्हेरिकोज व्हेन्सवर प्रभावी उपचार करता येतात. या उपचारांमुळे रुग्णांना जलद रिकव्हरी, कमीत कमी वेदना आणि दीर्घकालीन आराम मिळतो. एंडोव्हॅस्क्युलर लेसर ट्रीटमेंट (ईव्हीएलटी) ही एक दुर्बीणीद्वारे केली जाणारी शस्त्रक्रिया आहे. त्यात लेसर तंत्रज्ञानाचा वापर केला जातो.

**काय आहे प्रक्रिया?**

या प्रक्रियेत खराब झालेल्या रक्तवाहिन्या बंद केल्या जातात त्यामुळे निरोगी शिरांमधून रक्तप्रवाह सुरळीत होतो. ही शस्त्रक्रिया भूल देऊन केली जाते आणि रुग्ण कमीत कमी कालावधीत सामान्य होतो. एका आठवड्यात तो वेदनामुक्त आयुष्य जगू शकतो.

**'व्हेरिकोज व्हेन्स' का होतो?**

'व्हेरिकोज वेन्स'मध्ये अशुद्ध रक्तवाहिन्यांमध्ये रक्त एकाच ठिकाणी जमा होते. यामुळे या रक्तवाहिन्या फुगतात आणि पायात प्रचंड वेदना निर्माण होतात. दीर्घकाळ उभं राहिल्याने किंवा चालण्यामुळे पायांवर ताण येतो. दीर्घकाळ उभं राहणं, बैठी जीवनशैली, लठ्ठपणा, हार्मोनल बदल, गर्भधारणा आणि वय हे घटक 'व्हेरिकोज वेन्स'ला कारणीभूत ठरतात. 'व्हेरिकोज वेन्स'मध्ये वेदना, स्नायुंमधील जडपणा, सूज आणि फुगलेल्या शिरा अशी लक्षणं दिसून येतात.

**करा हे उपाय**

ही स्थिती टाळण्यासाठी पायांची नियमित हालचाल करा. जास्त वेळ उभं राहणं टाळा. वजन नियंत्रित राखा आणि 'कॉम्प्रेशन स्टॉकिंग्ज'चा वापर करा.

जीवनशैली

डॉ. महेश दळे

# केमोथेरपीनंतरही थांबवा केसगळती



कर्करोगावरील उपचारांमध्ये केमोथेरपीचा वाटा सर्वात मोठा असतो. पण या उपचारपद्धतीमुळे शरीरातील निरोगी पेशींचंही नुकसान होतं. डोक्यावरचे केस पूर्णपणे गळून जातात. केमोथेरपीदरम्यान केसगळती कमी करण्यासाठी 'स्काल्प कूलिंग' (कोल्ड कॅपिंग थेरपी) हे तंत्रज्ञान विकसित करण्यात आलं आहे. यापूर्वी ते केवळ अमेरिकेतील एमडी अँडरसनसारख्या निवडक आंतरराष्ट्रीय कर्करोगकेंद्रांवर उपलब्ध होतं; परंतु आता ते भारतीय रुग्णांसाठीदेखील उपलब्ध झालं आहे. कर्करोगग्रस्तांच्या जीवनमानात सुधारणा करण्याच्या दिशेने एक मोठं पाऊल म्हणून नवी दिल्लीतील एका रुग्णालयाने 'कोल्ड कॅपिंग थेरपी' सुरू केली आहे. केसगळती हा केमोथेरपीचा सर्वात स्पष्ट आणि त्रासदायक दुष्परिणामांपैकी एक आहे. यामुळे अनेकदा रुग्णाच्या आत्मविश्वासावर परिणाम होतो. 'कोल्ड कॅपिंग थेरपी' रुग्णांना उपचारादरम्यान त्यांचे केस टिकवून ठेवण्यास मदत करते. त्यामुळे कर्करोगाच्या निदानानंतर येणारा मानसिक ताण कमी होतो.

**केस गळतीची समस्या कमी**

या थेरपीमध्ये केमोथेरपी सत्रांपूर्वी, दरम्यान आणि नंतर ६४ ते ७२ अंश फॅरेनहाइट तापमानात थंड केलेलं एक विशिष्ट थर्मामीटर वापरलं जातं. ते टाळूमधला रक्तप्रवाह कमी करतं. त्यामुळे केमोथेरपीच्या औषधांचा केसांच्या कूपांवर होणारा परिणाम कमी होतो आणि त्यामुळे केस गळण्याचं प्रमाण कमी होतं. या उपचारपद्धतीमुळे अनेक रुग्णांमध्ये केस गळती ७० टक्क्यांपर्यंत कमी होत असल्याचं दिसून आलं आहे.

**किफायतशीर पद्धत**

नवीन 'स्काल्प कूलिंग' तंत्र ही एक किफायतशीर, सोपी पद्धत आहे आणि विविध प्रकारच्या केमोथेरपीसाठी याची शिफारस केली जाऊ शकते. केमोथेरपीमुळे केस गळणं हे केवळ सौंदर्याशी निगडीत नाही, तर त्याचा रुग्णाच्या आत्मविश्वासावर परिणाम होतो.

**कर्करोग उपचारासाठी एक मोठे पाऊल**

या प्रगतीमुळे केवळ वैद्यकीय आरामच नाही, तर भावनिक उपचारदेखील मिळतो. कर्करोगाच्या उपचारांच्या दिशेने हे एक मोठं पाऊल आहे. अमेरिका आणि युरोपमधील ६,००० हून अधिक केंद्रं उपचारांचा भाग म्हणून 'स्काल्प कुलिंग'चा वापर करतात.

**'कोल्ड कॅपिंग' हा चांगला पर्याय**

रक्त कर्करोग, डोके आणि मानेचा कर्करोग किंवा थंडीबद्दल संवेदनशीलतेवर परिणाम करणाऱ्या परिस्थिती असलेल्या लोकांसाठी हा उपचार सुचवला जात नाही. सरसकट सगळ्याच रुग्णांवर या उपचारपद्धतीचा वापर करण्याऐवजी प्रत्येक रुग्णांची या उपचारपद्धतीप्रती अनुकुलता तपासून त्याचा निर्णय घेतला जातो. त्यामुळे सुरक्षितता आणि परिणामकारकता साधता येते. केमोथेरपीदरम्यान डोक्यात रक्तप्रवाह कमी करून हे तंत्र काम करते. त्यामुळे केसांच्या कूपांवर होणारा परिणाम कमी होतो. यासाठी प्रत्येक रुग्ण पात्र नसला तरी, हे तंत्रज्ञान अनेक रुग्णांची सुमारे ७० टक्के केसगळती रोखते.

नवं तंत्रज्ञान

डॉ. सतीश सोनवणे

# अकारण येणारा घाम धोकादायक



शरीराला कोणत्याही कारणाशिवाय जास्त घाम येऊ लागतो, तेव्हा ती सामान्य गोष्ट नाही. वैद्यकीय भाषेत याला 'हायपरहाइड्रोसिस' म्हणतात. यात शरीराच्या काही भागातून जास्त घाम येतो. यामुळे केवळ शारीरिक अस्वस्थताच निर्माण होत नाही, तर मानसिक ताणदेखील येऊ शकतो.

**'हायपरहाइड्रोसिस'मुळे समस्या का?**

'हायपरहाइड्रोसिस'चे दोन प्रकार आहेत. प्राथमिक आणि माध्यमिक. प्राथमिक 'हायपरहाइड्रोसिस'मध्ये बहुतेकदा हात, पाय, काखेत किंवा चेहऱ्यावर घाम येतो. दुय्यम 'हायपरहाइड्रोसिस' हा थायरॉईड, मधुमेह, लठ्ठपणा, संसर्ग किंवा हार्मोनल बदलांसारख्या इतर आजारांमुळे होतो. यामध्ये संपूर्ण शरीराला घाम येऊ शकतो आणि काही औषधांच्या दुष्परिणामांमुळेही हे होऊ शकतं.

सतत घाम येण्यामुळे केवळ अस्वस्थताच येतं असं नाही, तर त्वचेवर बुरशीजन्य किंवा जीवाणूंचा संसर्गदेखील होऊ शकतो. जास्त घाम आल्याने शरीरात मीठ आणि पाण्याचं प्रमाण कमी होऊ शकतं. त्यामुळे थकवा आणि अशक्तपणा येतो.

**उपचार आणि उपाय**

काही प्रकरणांमध्ये, बोटॉक्स इंजेक्शनदेखील प्रभावी ठरतात. ते घामाच्या ग्रंथींना तात्पुरते ब्लॉक करतात. दुसरी पद्धत म्हणजे 'आयनोफोरेसिस'. त्यात घामाच्या ग्रंथींची क्रिया सौम्य प्रवाहाद्वारे कमी केली जाते. अत्यंत गंभीर प्रकरणांमध्ये, शस्त्रक्रिया करण्याचीदेखील शिफारस केली जाते. त्यात घाम निर्माण करणाऱ्या नसा कापल्या जातात.

**काय करावं?**

* ताण कमी करण्याचा प्रयत्न करावा
* सैल आणि सुती कपडे घालावेत
* शरीर स्वच्छ ठेवावं आणि संतुलित आहार घ्यावा
* कॅफेन, मसालेदार अन्न आणि धूम्रपान यापासून दूर राहावं

समजून घ्या

# रिकाम्या पोटी काय टाळावं ?

सुरुवात चांगली झाली तर संपूर्ण दिवस चांगला जातो. दिवस चांगला जाण्यासाठी पोटाचं आरोग्य उत्तम रहाणं गरजेचं आहे. म्हणूनच न्याहरी करायला हवी. न्याहरीतल्या पदार्थांवर पोटाचं आरोग्य अवलंबून असतं. काही पदार्थ आरोग्यदायी असले तरी रिकाम्या पोटी त्यांचं सेवन करू नये. अशाच काही पदार्थांविषयी...




* आंबट फळांमध्ये क जीवनसत्त्व असतं. पण ही फळं योग्य वेळी खायला हवीत. आंबट फळांमधल्या आम्लांमुळे पोटाच्या समस्यांमध्ये भर पडू शकते. गॅस्ट्रिक अल्सर किंवा ॲसिड रिफ्लक्सचा त्रास जाणवू शकतो. ही फळं दिवसभरात कधीही खाता येतील. मात्र आंबट फळं रिकाम्या पोटी खाऊ नयेत.
* मसाल्यांमुळे जेवणाची लज्जत वाढत असली तरी रिकाम्या पोटी म्हणजे सकाळच्या वेळी मसालेदार पदार्थ खाल्ल्यामुळे पचनसंस्थेशी संबधित समस्या डोकं वर काढू शकतात. टोमॅटोमध्ये टॅनिक ॲसिड असतं. त्यामुळे रिकाम्या पोटी टोमॅटो खाऊ नये.

आरोग्य सल्ला

# 'प्री-एक्लेम्पसिया'चं झटपट निदान

प्री एक्लेम्पसिया हा एक धोकादायक आजार आहे. हा विकार गर्भवती महिलांमध्ये आढळून येतो. या आजारामुळे रक्तदाब आणि लघवीमधील प्रथिनांच्या प्रमाणात वाढ होते. याचा परिणाम बाळ आणि आई दोघांवरही होतो. बऱ्याच प्रकरणांमध्य या अजाराचं निदान होत नाही; परंतु आता 'आयआयटी मद्रास'च्या शास्त्रज्ञांनी केलेल्या संशोधनामुळे रोगाची निदान सोपं झालं असून चाचणीनंतर केवळ तीस मिनिटांत अहवाल मिळू शकेल.

शास्त्रज्ञांनी 'फायबर ऑप्टिक्स सेन्सर' तंत्रज्ञानाचा वापर करून 'पॉइंट-ऑफ-केअर'चाचणी तंत्रज्ञान विकसित केलं आहे. आतापर्यंत 'प्री-एक्लेम्पसिया' शोधण्यासाठीच्या चाचण्यांना खूप वेळ लागत असे. मर्यादित साधनसंपत्तीमुळे दुर्गम भागातील रुग्णालयांमध्ये ही चाचणी करता येत नव्हती. अशा परिस्थितीत, आता 'प्री-एक्लेम्पसिया' सहजपणे शोधता येईल. या चाचणीची अचूकता ९० टक्क्यांहून अधिक आहे आणि त्यामुळे गर्भवती महिलांमध्ये प्री-एक्लेम्पसियाचा धोका ओळखणं सोपं झालं आहे.



**लवकर निदान**

'फायबर ऑप्टिक्स सेन्सर' तंत्रज्ञानाच्या मदतीने, गर्भधारणेच्या ११ व्या आठवड्यात हा आजार ओळखता येतो. त्याच्या मदतीने, महिलांना वेळेवर ॲस्पिरिनसारखी औषधे देऊन 'प्री-एक्लेम्पसिया'चा धोका कमी करता येतो. 'आयआयटी मद्रास'च्या 'बायोसेन्सर्स लॅब'चे प्राध्यापक व्हीव्ही राघवेंद्र साई म्हणतात, 'प्लेसेंटल ग्रोथ फॅक्टर' (पीएलजीएफ) हा 'प्री-एक्लेम्पसिया' शोधण्यासाठी वापरला जाणारा 'अँजिओजेनिक' रक्त बायोमार्कर आहे. 'प्री-एक्लेम्पसिया' शोधण्यासाठी 'प्लास्मोनिक फायबर ऑप्टिक ॲब्सॉर्बन्स बायोसेन्सर' विकसित करण्यात आला आहे. तो गर्भवती महिलांमध्ये ३० मिनिटांत 'प्री-एक्लेम्पसिया'चं निदान करू शकेल.

**अन्य आजारांचेही निदान**

'आयआयटी मद्रास'च्या संशोधकांच्या मते, पॉइंट-ऑफ-केअर (पीओसी) चाचणी तंत्रज्ञान केवळ 'प्री-एक्लेम्पसिया'च नाही तर टीबी, कर्करोग आणि अल्झायमर यासारख्या आजारांचंही निदान करू शकेल. या तंत्रात 'डिस्पोजेबल पीओएफ' वापरला जातो. याच्या मदतीने, चाचणी सहजपणे करता येते आणि ती सर्वत्र उपलब्ध करून देता येते. लवकर निदान झाल्याने वेळेत उपचार सुरू करता येतात. गंभीर आजारापासून स्त्री आणि बाळाचं संरक्षण करून, भविष्यातील कोणतीही जोखीम कमी करण्यास मदत करते.

**'प्री-एक्लेम्पसिया'ची लक्षणं**


उच्च रक्तदाब, मूत्रात प्रथिनांचं प्रमाण वाढणं. चेहरा, पाय, घोटे किंवा हातांवर सूज येणं. तीव्र किंवा सतत डोकेदुखी, दृष्टीमध्ये बदल.

व्याधीविकार

डॉ. दीपाली नेने

# दम्याचा सामना करताना

दमा हा श्वसनाशी संबंधित एक विकार असून त्याचा त्रास हळूहळू वाढत जातो. वेळीच काळजी घेतली नाही, तर तो प्राणघातकदेखील ठरू शकतो. अशा परिस्थितीत वेळीच उपचार घेण्याची आवश्यकता आहे. दमा या विकारात फुफ्फुसांच्या नलिका अरुंद होतात आणि श्वास घेण्यास त्रास होतो. ॲलर्जी, प्रदूषण, हवामान किंवा अनुवांशिक कारणांमुळे दमा होऊ शकतो. त्यामुळे याबाबत अधिक सतर्क राहण्याची गरज आहे. सततचा खोकला,गुदमरल्यासारखं वाटणं, छातीत जडपणा, धापा टाकणं, ही दम्याची लक्षणं आहेत.



**चाचण्या**

* फुफ्फुसांचं कार्य तपासण्यासाठी सर्वप्रथम 'स्पायरोमेट्री' ही चाचणी केली जाते.
* त्यानंतर 'पीक फ्लो मीटर चाचणी' ही चाचणीही केली जाते. या चाचणीमध्ये श्वास सोडण्याची शक्ती मोजली जाते. यावरून श्वासनलिका किती प्रमाणात ब्लॉक झाली आहे हे दिसून येतं.
* ॲलर्जी चाचणी केल्यानंतर एखाद्या ॲलर्जीमुळे दमा झाला असल्यास ॲलर्जीचं नमकं कारण समजतं.
* 'फॅनो' चाचणी (फ्रॅक्शनल एक्सहेल्ड नायट्रिक ऑक्साईड) फुफ्फुसांमध्ये होणाऱ्या जळजळीची मोजणी करते.

डॉक्टरांच्या मते, दम्यावर खात्रीशीर उपचार नाही; परंतु योग्य औषधं आणि जीवनशैलीतील बदलांच्या साह्याने तो नियंत्रणात ठेवता येतो. दम्याची तीव्रता कमी करण्यासाठी इन्हेलर, नेब्युलायझर आणि अँटी-ॲलर्जी औषधं वापरली जातात. पण दम्याचा त्रास असेल तर विशेष काळजी घेणं गरजेचं असतं. धूळ, धूर, पाळीव प्राण्यांचे केस, थंड हवा आणि तीव्र परफ्यूम यांसारखे ट्रिगर्स टाळायला हवेत.

आरोग्यविशेष

डॉ. कुंदन गायकवाड

# हार्मोन्सच्या असंतुलनामुळे

महत्त्वाचं काम सुरू असताना तुम्हाला अचानक भोवळ आली आहे का, तुम्हाला अस्वस्थ वाटलं आहे का, अचानक गरगरायला लागलं आहे का, काही क्षणांसाठी डोळ्यांपुढे अंधारी आली आहे का... अनेकांना या समस्येला सामोरं जावं लागतं. याला 'ब्रेन फॉग' असं म्हणतात. हा त्रास कोणालाही, कधीही जाणवू शकतो. ब्रेन फॉग ही एक व्याधी आहे. यात काही काळासाठी रुग्णाचा गोंधळ उडतो, कामावरचं लक्ष उडतं, मन एकाग्र होत नाही. यामुळे तुमची उत्पादकताही कमी होऊ शकते. ब्रेन फॉग हा त्रासदायक विकार असून हार्मोन्सच्या असंतुलनामुळे हा त्रास जाणवतो. हार्मोन्सचं असंतुलन हे डोकं गरगरण्यामागचं महत्त्वाचं कारण आहे, असं म्हणता येईल.

शरीरातले हार्मोन्स संतुलित असताना आपलं लक्ष केंद्रित होतं. पण त्यांच्या असंतुलनामुळे शरीराच्या कार्यावरच परिणाम होतो. त्यामुळे सातत्याने गरगरत असेल, लक्ष केंद्रित करताना अडचणी येत असतील तर ठराविक चाचण्या करणं गरजेचं आहे. ठराविक हार्मोन्सचं असंतुलन या त्रासाला कारणीभूत ठरतं.

थायरॉइडची पातळी कमी झाल्यास मेंदूच्या कार्यात अडथळे येतात. थायरॉइड ग्रंथींमधून पुरेशा प्रमाणात हार्मोन्स स्रवले नाहीत तर त्याचा त्रास होऊ शकतो. यामुळे विस्मरण तसंच विचारक्षमतेवर परिणाम होई शकतो. थायरॉइडची पातळी कमी झाल्याने मेंदूचं कार्य मंदावतं. याचा आपल्या प्रतिक्षिप्त क्रियेवरही परिणाम होतो. मेंदूला लवकरच सूचना मिळत नाहीत तसंच तो लवकर संदेश पाठवू शकत नाही. थायरॉइड ग्रंथींच्या असंतुलनामुळे वजन वाढणं, अशक्तपणा, नैराश्य, अस्वस्थता आणि थंडीचा त्रास अशा समस्या जाणवू शकतात.

प्रत्येकालाच कधी ना कधी ताण आणि नैराश्य जाणवतं. क्वचित प्रसंगी असा त्रास होऊ शकतो. मात्र ही समस्या वारंवार जाणवत असेल तर याचा संबंध हार्मोन्सच्या असंतुलनाशी जोडला जाऊ शकतो. अतिताणामुळे शरीरात कॉर्टिसोल या हार्मोन्सची निर्मिती होते. यामुळे ब्रेन फॉग होतो. आपल्या शरीरातल्या कॉर्टिसोलचं प्रमाण नेहमीच संतुलित असायला हवं. कॉर्टिसोलचं प्रमाण कमी किंवा जास्त झाल्यास त्याचा मेंदूच्या कार्यावर परिणाम होऊ शकतो. ताणाच्या या हार्मोन्सच्या पातळीत बदल झाल्यास चिंता, नैराश्य तसंच स्मरणशक्तीशी संबंधित समस्या उद्भवू शकतात. तसंच याचा पेशींवर परिणाम झाल्यामुळे अशक्तपणा, उत्साह कमी होणं अशा समस्याही जाणवू शकतात.



चाळीशीच्या आसपासच्या महिलांना ही समस्या अधिक प्रमाणात जाणवू शकते. एस्ट्रोजेन आणि प्रोजेस्टिन अशा हार्मोन्सच्या असंतुलनामुळे ही समस्या जाणवते. या दोन्ही हार्मोन्सच्या पातळ्यांमधले चढउतार लक्ष केंद्रित करू देत नाहीत. याचा एकाग्रतेवर परिणाम होतो. हार्मोन्सचं असंतुलन वजन वाढणं, मूड बदलणं, रात्री घाम येणं या समस्याही निर्माण करतं.

त्यामुळे मन एकाग्र होत नसेल, कामात लक्ष लागत नसेल तर हार्मोन्सची चाचणी करून घ्यायला हवी.

आरोग्यचर्चा

नवसंशोधन

## कर्करोगाचं समूळ उच्चाटन?



कर्करोगावर अद्यापही उपचार सापडलेला नाही. कर्करोगावर नियंत्रण मिळवता येतं. मात्र ही व्याधी कधीही पूर्णपणे बरी होत नाही. ही व्याधी पूर्ण बरी करणारं औषध शोधण्यात शास्त्रज्ञांना आजवर अपयश आलेलं आहे. मात्र कर्करोगाचा समूळ नायनाट करणारा विषाणू सापडल्याचा दावा शास्त्रज्ञांनी केला आहे. अर्थात याबाबत अजूनही संशोधन सुरू आहे. कर्करोगाचं निदान झाल्यावर रुग्णासह त्याचे नातेवाईक हातपाय गाळतात. जगभरातच कर्करोगाच्या रुग्णांमध्ये वाढ होते आहे. भारतातही कर्करोगाचं प्रमाण प्रचंड वाढलं आहे.

दंतारोग्य

## दातदुखीवर घरगुती उपाय

दात दुखू लागल्यावर आपण विविध उपाय करतो. वेदनाशामक औषधं घेतो. मात्र काही घरगुती उपायांमुळे तुमची दातदुखी दूर होऊ शकते. मीठ आणि काळी मिरी दातदुखीवरचा रामबाण उपाय ठरू शकतो. दातदुखी दूर करण्यासाठी थोडं मीठ घ्या. त्यात थोडी मिरपूड घाला. या मिश्रणात पाणी घाला. दात दुखत असलेल्या भागावर या मिश्रणाने मसाज करा. यामुळे दातदुखी कमी होईल. तसंच लसणाच्या कळीवर थोडं मीठ लावून दातात धरा. यामुळे तुम्हाला बरं वाटेल. दातांचं आरोग्य राखण्यासाठी दररोज सकाळी कच्चा कांदा खा.



डोळ्यांचे आरोग्य

## अशा दूर करा डोळ्यांच्या समस्या

सध्याच्या काळात डोळ्यांच्या समस्या वाढत चालल्या आहेत. सतत कॉम्प्युटरवर डोळे लावून बसल्यामुळे खूप त्रास होतो. डोळे दुखू लागतात, डोळ्यातून पाणी येतं. हा त्रास कमी करण्यासाठी काही सोपे उपाय करता येतील. सकाळी उठल्यानंतर तोंडात पाणी भरा. त्यानंतर डोळ्यांवर थंड पाण्याचे हबके मारा. यामुळे तुम्हाला बरं वाटेल. अजून एक सोपा उपाय म्हणजे दोन्ही पायांच्या अंगठ्यांची तेलाने मालीश करा. हा उपायही उपयुक्त ठरू शकतो. यामुळे दृष्टी सुधारते. थंडीत लाल गाजरं मिळतात.



आजीबाईचा बटवा

## गुणकारी कांदा

कांदा औषधी आहे हे आपण जाणतो. मात्र कांद्यामुळे मधुमेहावर नियंत्रण मिळवता येतं. कांद्यातल्या फ्लेवेनॉइड्समुळे रक्तातली शर्करा नियंत्रणात रहाते. यासोबतच कांद्यात फायबरही भरपूर प्रमाणात असतं. यामुळे रक्तात शर्करा मिसळण्याची प्रक्रिया मंदावते. कांद्यामुळे आपल्या शरीरातले विषारी घटक बाहेर पडतात. यामुळे पचनाचं कार्य सुधारतं. बद्धकोष्ठतेची समस्या दूर होते. मधुमेहींनी कर्बोदकांचं कमी प्रमाणात सेवन करायला हवं. कांद्यात कर्बोदकं कमी प्रमाणात असतात. त्यामुळे मधुमेहींनी कांदा खायला हवा.





नालेगांव गाडगीळ पटांगणाचे रस्ता कॉंक्रिटीकरणाचे काम मार्गी लावून द्यावे अशी मागणी ग्रामस्थांच्यावतीने आमदार संग्राम जगताप यांना निवेदनाद्वारे करण्यात आली. (छाया - लहू दळवी)

# गाडगीळ पटांगण येथे पूर्ण कॉंक्रिटीकरणाचे काम मार्गी लावू : आमदार संग्राम जगताप

**नालेगाव ग्रामस्थांनी घेतली भेट**

नगर - गाडगीळ पटांगण, नालेगांव येथे महानगरपालिका यांच्या मालकीची ओपन स्पेस जागा असुन या जागेत श्री पावन हनुमान मंदिर असुन ते नालेगांव व परिसरातील भावीकांचे श्रध्दास्थान आहे. या ठिकाणी विविध धार्मिक, सामाजिक तसेच सांस्कृतिक कार्यक्रम वर्षानुवर्ष होत आहे. त्यात हनुमान जयंती, हरीनाम सप्ताह तसेच परिसरातील नागरिकांचे कौटूंबिक कार्यक्रम साजरे होऊन परिसरातील नागरिकांना या जागेचा उत्तम प्रकारे उपयोग होत आहे. महापालिकेच्यावतीने ड्रेनेज लाईन टाकण्यात आल्याने रस्त्याचे कॉंक्रिटीकरणाचे काम देखील चालु आहे. काम चालु असताना गाडगीळ पटांगण येथील संपुर्ण मोकळ्या जागेस कॉंक्रिटीकरणाचे काम मार्गी लागल्यास परिसरातील नागरिकांची सोय होऊन हा परिसर स्वच्छ व सुशोभीकरण होईल. यासाठी नालेगाव ग्रामस्थांच्यावतीने आमदार संग्राम जगताप यांना निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली आहे.

यावेळी माजी नगरसेवक दत्तात्रय मुदगल, विजय चितळे, राजू मुदगल, सुनील चितळे, प्रवीण वाघ, किरण कुलकर्णी, अभी कांबळे, गजेंद्र कवडे, चांगदेव मरकड, भाऊ भालेकर, हेमंत चाकणकर, मोहन बुगे, देविदास मुदगल, रामदास सुंकी, धीरज मुदगल, अमर मुदगल, बापू कवडे आदी उपस्थित होते.

ही मागणी लवकरच पूर्ण होऊन कॉंक्रिटीकरणाचे काम मार्गी लावले जाईल, असे आश्वासन आमदार संग्राम जगताप यांनी यावेळी शिष्टमंडळास दिले.

# कै.दादासाहेब श्रीराम यांच्या कुटुंबीयांना ५० लाख रुपये मदतीचा धनादेश सुपूर्द

**विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या हस्ते वाटप**



ग्रामपंचायत कर्मचारी कै.दादासाहेब श्रीराम यांच्या कुटुंबीयांना ५० लाख रुपये शासकीय मदतीचा धनादेश सुपूर्द करताना विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे आदी.

नगर - कर्जत तालुक्यातील राक्षसवाडी बुद्रुक ग्रामपंचायतचे पाणीपुरवठा कर्मचारी कै. दादासाहेब झुंबर श्रीराम यांनी कोविड काळात आपले कर्तव्य बजावत असताना प्राण गमावले. राज्य शासनाने जाहीर केलेल्या ५० लाख रुपयांच्या सानुग्रह अनुदान योजनेचा धनादेश विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांच्या हस्ते त्यांच्या कुटुंबीयांना देण्यात आला.

कै.दादासाहेब श्रीराम यांच्या कुटुंबाला मदत मिळावी यासाठी सभापती प्रा.राम शिंदे यांनी जिल्हा परिषदेकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. आज त्यांच्या पत्नी श्रीमती नंदाताई श्रीराम व पुत्र कु. सौरभ श्रीराम यांच्याकडे शासन निर्णयानुसार ५० लाख रुपयांचा विमा अनुदानाचा धनादेश श्री.शिंदे यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आला. हा क्षण केवळ आर्थिक मदतीचा नव्हे, तर शासन आपल्या कर्मचाऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे याचे उदाहरण आहे, असे मत सभापती शिंदे यांनी यावेळी व्यक्त केले.

या प्रसंगी जिल्हा परिषदेचे माजी सदस्य शांतीलाल कोपणर, जिल्हा परिषदेचे कार्यकारी अभियंता बाळासाहेब ननवरे, गटविकास अधिकारी रूपचंद जगताप, ग्रामपंचायत अधिकारी अविनाश मेहेत्रे व शाम भोसले आदी उपस्थित होते.

# डॉ.पाऊलबुधे विद्यालयाचा ओम सानपने मल्लखांब स्पर्धेत २ रा क्रमांक मिळविला



नगर - वसंत टेकडीतील येथील डॉ.ना.ज.पाऊलबुधे विद्यालयाचा विद्यार्थी ओम घनश्याम सानप यांनी खेलो इंडिया बीच गेम्स स्पर्धेत अहिल्यानगरचा मल्लखांबपटू म्हणून भाग घेत पुरलेला मल्लखांब, टांगता मल्लखांब, तसेच दोरीवरील मल्लखांब या प्रकारात ओमने उत्कृष्ट कामगिरी करून द्वितीय क्रमांकाचे विजेतेपद मिळविले

महाराष्ट्रातील अहिल्यानगर संघाचा ओम सानप यांनी सांघिक प्रकारात देखील उत्कृष्ट कामगिरी करीत रौप्यपदक पटकाविले आहे. या यशाबद्दल डॉ. पाऊलबुधे विद्यालयाचे माजी प्राचार्य भरत बिडवे यांनी अभिनंदन केले. नुकत्याच बारावी बोर्ड परीक्षेत विज्ञान शाखेतून चांगले गुण मिळवून उत्तीर्ण झालेला विद्यार्थी आहे.

भारत सरकारचा उपक्रम खेलो इंडिया बीच गेम मध्ये गुजरात मधील ब्लू प्लग बीच दिन दमन येथे पार पडलेल्या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्र मल्लखांब संघात ओम याची निवड झाली होती ती निवड सार्थ करीत महाराष्ट्राचे नाव तसेच विद्यालयाचे नाव राष्ट्रीय स्तरावर उंचावले ही अभिमानास्पद गोष्ट असल्याचे प्राचार्या विजया नवले यांनी म्हटले आहे.

ओम सानप याने मिळविलेल्या या उज्वल यशा बद्दल सेवा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष विनय पाऊलबुधे, उपाध्यक्ष रामभाऊ बुचकूल, सचिव रामकिसन देशमुख, खजिनदार दादासाहेब भोईटे, सर्व संचालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आदींनी अभिनंदन करून कौतुक केले आहे.

# कर्जतच्या प्राचीन दक्षिणमुखी हनुमान मंदिर परिसरातील अतिक्रमणे २६ मे रोजी हटणार

**जिल्हाधिकाऱ्यांचे उपोषणकर्त्यांना आश्वासन : आमदार संग्राम जगताप यांच्या उपस्थितीत बैठक**



कर्जत शहरातील प्राचीन दक्षिणमुखी हनुमान मंदिर परिसरातील अतिक्रमणे सोमवारी हटणार असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे उपोषणकर्त्यांना आश्वासन दिले. यावेळी आ. संग्राम जगताप व इतर. (छाया - लहू दळवी)

नगर - कर्जत येथील प्राचीन दक्षिणमुखी हनुमान मंदीर परिसरामध्ये अतिक्रमण करून त्या ठिकाणी काही लोक मंदिराचे पावित्र्य नष्ट करत आहेत. तसेच दिवसेंदिवस हे अतिक्रमण वाढवले जात असून, यामुळे मंदिर परिसरामध्ये जाण्यासाठी भाविकभक्तांना मोठी कसरत करावी लागत आहे. हे अतिक्रमण तात्काळ काढावे, या मागणीसाठी शशिकांत बोंगाणे, त्यांची पत्नी स्वाती बोंगाणे आणि शुभम माने हे १४ मे पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणास बसले होते. तर या अतिक्रमणा विरोधात कर्जत येथील ग्रामस्थ आक्रमक झाले होते. १६ मे रोजी कर्जत बंद ठेवून कर्जतच्या ग्रामस्थांनी या उपोषणाला पाठिंबा व्यक्त केला होता. आणि कर्जतच्या छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये आमदार संग्राम जगताप आणि आमदार गोपीचंद पडळकर यांच्या नेतृत्वाखाली रस्ता रोको आंदोलन करण्यात आले होते. अखेर जिल्हाधिकारी कार्यालयात या अतिक्रमण प्रश्नाविषयी जिल्हाधिकारी पंकज आशिया यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली.

यावेळी आमदार संग्राम जगताप यांच्यासह कर्जतचे प्रांताधिकारी, कर्जत नगरपंचायतचे कार्यकारी अधिकारी तसेच बांधकाम विभागातील अभियंता आणि कर्जत तालुक्याचे पोलीस निरीक्षक यांच्यासह उपोषणकर्ते तसेच कर्जतमधील हिंदुत्ववादी संघटनांचे पदाधिकारी, नागरिक यांच्यासह चर्चा करून सर्व कायदेशीर बाबी पडताळून सोमवारी अतिक्रमण काढण्याची कारवाई करणार असल्याचे लेखी आश्वासन जिल्हाधिकाऱ्यांनी उपोषणास बसलेले शशिकांत बोंगाणे, त्यांची पत्नी स्वाती बोंगाणे आणि शुभम माने यांना दिल्यानंतर जिल्हाधिकारी पंकज आशिया आणि आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते उपोषण सोडण्यात आले.

उपोषण सोडल्यानंतर गेल्या १० दिवसांपासून उपोषणास बसलेले शशिकांत बोंगाणे यांनी प्रतिक्रिया व्यक्त करताना सांगितले की, सोमवारपर्यंत सर्व अतिक्रमण काढण्याचे लेखी आश्वासन मिळाल्यानंतर आम्ही उपोषण सोडत आहोत तर आमदार संग्राम जगताप यांनीही या गोष्टीचा पाठपुरावा सुरुवातीपासूनच सुरू ठेवला होता. जिल्हाधिकाऱ्यांच्या समवेत झालेल्या बैठकीत तोडगा निघाला असून, जरी लेखी आश्वासन मिळाले असले तरी जोपर्यंत अतिक्रमण निघणार नाही, तोपर्यंत आम्ही त्याचा पाठपुरावा करतच राहणार, असे आमदार संग्राम जगताप म्हणाले.

# अहिल्यानगर शहरामधील विविध प्रश्न सोडविण्याला प्राधान्य देणार : ना. शिंदे

**शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास अहिल्यानगर शहरात मंजुरी दिल्याबद्दल सत्कार**



शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास अहिल्यानगर शहरात मंजुरी दिल्याबद्दल विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांचा सत्कार वसंत लोढा यांच्या निवासस्थानी सत्कार करण्यात आला.

नगर - अहिल्यानगर शहरात शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या उभारणीसाठी राज्य सरकारने ४८५ कोटी रुपयांच्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे. महाविद्यालयास जागा उपलब्ध होईपर्यंत हे शासकीय महाविद्यालय जिल्हा रुग्णालयाच्या ठिकाणी ताबडतोब सुरू करण्यात येईल, असे महाराष्ट्र राज्य विधानपरिषदेचे सभापती नामदार प्रा.राम शिंदे यांनी सांगितले. तसेच शहरातील विविध प्रश्न व जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी प्राधान्य देण्यात येईल. शहराच्या विकासासाठी भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून कामे केली जाते. कार्यकर्ते ज्या ज्या वेळेस शहराचे प्रश्न मांडतील ते सर्व प्रश्न जातीने लक्ष देऊन सोडविण्यात येतील. असे त्यांनी सांगितले.

प्रा.राम शिंदे यांनी वसंत लोढा यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास अहिल्यानगर शहरात मंजुरी दिल्याबद्दल प्रा.राम शिंदे यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी भारतीय जनता पार्टीचे शहर जिल्हाध्यक्ष अभय आगरकर, सदा देवगावकर, प्रदेश कार्यकारणी सदस्य वसंत लोढा, माजी नगराध्यक्षा लता लोढा, ओबीसी मोर्चाचे शहर जिल्हाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, सरचिटणीस प्रशांत मुथा, उपाध्यक्ष बाबासाहेब सानप, महेश नामदे, सी.ए.राजेंद्र काळे, तुषार पोटे, राजेंद्र बलदोटा, सागर भोपे, कुणाल भंडारी, बाळासाहेब खताडे, जैन कॉन्फरन्सचे राष्ट्रीय संचालक राजेंद्र बलदोटा, पोपट लोढा, गणेश झंवर, पारस लोढा, साहेबराव विधाते, सागर शिंदे, रोहित पठारे, सचिन पळशीकर आदी उपस्थित होते.

यावेळी वसंत लोढा म्हणाले, प्रा.राम शिंदे यांच्या माध्यमातून अहिल्यानगर जिल्ह्यात विकास गंगा वाहत आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचा लाभ नगरकरांना मिळणार आहे. राज्य सरकारने शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची अहिल्यानगर शहरात मंजुरी दिल्याबद्दल राज्य सरकारचे नगरकरांच्या वतीने अभिनंदन करतो. तसेच शहरातील विविध प्रश्न सोडविण्यासाठी प्रा.राम शिंदे पुढाकार घेतील, असे त्यांनी सांगितले.

# मतदान केंद्राबाहेर मतदारांसाठी मोबाईल ठेवण्याची सुविधा देणार : निवडणूक आयोग

**प्रचाराच्या नियमांमध्ये सुधारणाही केली**

मुंबई - मतदारांच्या सोयीसाठी आणि मतदान दिवशीच्या व्यवस्थापनात सुधारणा करण्याच्या उद्देशाने, भारत निवडणूक आयोगाने दोन महत्त्वपूर्ण निर्णय जाहीर केले आहेत. त्यानुसार, मतदान केंद्राच्या बाहेर मोबाईल ठेवण्यासाठी सुविधा उपलब्ध करून दिली जाणार असून, प्रचारासाठीची मर्यादा देखील नव्याने निश्चित करण्यात आली आहे. हे निर्णय लोकप्रतिनिधी अधिनियम, १९५१ आणि निवडणूक आचारसंहिता, १९६१ यांच्याशी सुसंगत आहेत.

मोबाईल फोनचा ग्रामीण आणि शहरी भागांमध्ये वाढता वापर लक्षात घेता, तसेच वृद्ध, महिला आणि दिव्यांग मतदारांना येणाऱ्या अडचणींचा विचार करता, आयोगाने मतदान केंद्राच्या बाहेरच मोबाईल ठेवण्याची सुविधा देण्याचा निर्णय घेतला आहे. मतदान केंद्राच्या १०० मीटरच्या आत केवळ बंद अवस्थेतील मोबाईल्स नेण्यास परवानगी राहील. प्रवेशद्वाराजवळ सोप्या बॉक्स किंवा पोत्यांद्वारे ही सुविधा दिली जाणार असून, मतदारांना मतदान केंद्रात मोबाईल घेऊन जाण्यास परवानगी दिली जाणार नाही. मात्र, काही ठिकाणी परिस्थिती बिघडण्याची शक्यता असल्यास, निवडणूक निर्णय अधिकारी याला अपवाद देऊ शकतात. मतदान गुप्ततेचा नियम (नियम ४९एम) यापुढेही काटेकोरपणे पाळला जाणार आहे.

प्रचाराच्या संदर्भातही महत्त्वाचा बदल करण्यात आला असून, मतदान केंद्राच्या १०० मीटर अंतराच्या आत प्रचारास मनाई करण्यात आली आहे. मतदान दिवशी उमेदवारांनी मतदारांसाठी अनौपचारिक ओळखपत्र (VIS नसल्यास) देण्यासाठी ठेवलेले मदत बूथ हे आता मतदान केंद्राच्या १०० मीटरच्या पलीकडे ठेवावे लागणार आहेत.

भारत निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि निवडणूक आयुक्त डॉ.सुखबीर सिंग संधू व डॉ.विवेक जोशी यांच्या नेतृत्वाखाली, आयोग मतदान प्रक्रिया कायद्याच्या चौकटीत पार पाडण्याबरोबरच मतदारांसाठी सुविधा सुधारण्यासाठी सातत्याने नवकल्पना राबवत असल्याचे भारत निवडणूक आयोगाने कळविले आहे.

# श्रीशनैश्वर जन्मोत्सवानिमित्त रामचंद्र खुंटावरील शनीगल्लीत २६ मे रोजी कार्यक्रमांचे आयोजन



नगर - रामचंद्र खुंटावरील शनीगल्लीतील स्वयंभू शनी-मारूती देवस्थानमध्ये २६ मे रोजी श्रीशनैश्वर जन्मोत्सवानिमित्त कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती मंदिराचे वंशपरंपरागत पुजारी ओम पांडे यांनी दिली.

ते म्हणाले, श्रीशनैश्वर महाराज जन्मोत्सव २६ मे रोजी मंदिरातील परंपरेप्रमाणे विधियुक्त साजरा करण्यात येणार आहे. सकाळी ७ वाजता श्री शनिमहाराजांना सामुहिक महाअभिषेकाने या सोहळ्याचा शुभारंभ होईल. शास्त्रोक्त पध्दतीने जलाभिषेक, पंचद्रव्याभिषेक, तैलाभिषेक, जपअनुष्ठान, होमहवन असे विधीयुक्त कार्यक्रम क्रमाने होतील. लघुरूद्राभिषेक होताच महाआरती होईल. सूर्यास्ताच्यावेळी सायंकाळी ७ वाजता श्रीशनीमहाराजांचा जन्मोत्सव सोहळा प्रथेप्रमाणे साजरा केला जाईल. सायंकाळी ७.३० ते ९.३० या वेळेत महाप्रसाद सोहळ्याचा कार्यक्रम पार पडेल. रात्री ९.३० वाजता हनुमान चालिसा पठण एवम् भजन संध्या सुरू होईल.

या सर्व कार्यक्रमांचा आणि महाप्रसादाचा लाभ सहकुटूंब घ्यावा, असे आवाहन श्रीशनी सेवा संघाच्यावतीने ओम पांडे यांनी केले आहे.

# अभिषेक कानडे यांना अमेरिकेच्या विद्यापीठाची एम.एस. पदवी



नगर- नगर शहरातील अभिषेक कानडे यांनी क्लीव्हलॅन्ड स्टेट युनिव्हर्सिटी अमेरिका या विद्यापीठातुन मास्टर ऑफ सायन्स इन केमिकल इंजिनियरींग पदवी मिळवली आहे.

अभिषेक हे अहिल्यानगर येथील महानगरपालिका येथे कार्यरत असलेले किशोर दत्तात्रय कानडे व योगशिक्षिका सौ. ज्योती कानडे यांचे चिरंजीव आहेत तसेच वन विभागातील कै. दत्तात्रय कानडे व शेतकरी कै. प्रभाकर दादा लोंढे यांचा तो नातु आहे. त्याचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण अहिल्यानगर येथील भाउसाहेब फिरोदिया हायस्कुल येथे झाले असुन केमिकल बी.टेक. शासकीय तंत्रज्ञान विद्यापीठ, रायगड येथे झालेले आहे.

# वैद्यकीय महाविद्यालयाच्या मंजुरीसाठी पाठपुरावा करणाऱ्या खा.निलेश लंके यांनी प्रशासनाला दिला उपलब्ध जागांचा तपशील



नगर - अहिल्यानगर जिल्ह्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व्हावे यासाठी संसदेचे लक्ष वेधणाऱ्या खा. निलेश लंके यांच्या पाठपुराव्याला मोठे यश आले असून राज्य शासनाच्या २३ मे रोजीच्या शासन निर्णयानुसार निधी मंजूर झाला असून या महाविद्यालयास पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्यात येणार आहे. या महाविद्यालयासाठी नगर जवळ उपलब्ध असणाऱ्या जागांचा तपशील आता खा. लंके यांनी प्रशासनाला दिला आहे.

राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय असताना अहिल्यानगर जिल्ह्यात हे महाविद्यालय नसल्याने खा. निलेश लंके यांनी लोकसभेची निवडणूक जिंकल्यानंतर संसदेमध्ये या विषयावर सातत्याने आवाज उठविला होता. यासंदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह संबंधित केंद्रीय मंत्र्यांकडे खासदार सुप्रिया सुळे यांच्यामार्फत खा. लंके यांनी पाठपुरावा केला होता. केंद्र सरकारच्या मान्यतेनंतर ६ मे रोजी जिल्ह्यातील चौंडी येथे पार पडलेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तसेच संलग्नित ४३० रूग्णखाटांचे रूग्णालय उभारण्यास मान्यता देण्यात आली होती. २३ मे रोजी शासन निर्णय पारीत करण्यात आल्याने या महाविद्यालयाच्या उभारणीचा मार्ग मोकळा झाला आहे.

## खा. लंके यांनी लक्ष वेधताच महाविद्यालयास मान्यता

राज्यातील पालघर, गडचिरोली, अमरावती, वाशिम, जालना, बुलढाणा, अंबरनाथ, भंडारा व हिंगोली येथे शासकीय महाविद्यालय सुरू करण्याबाबत २८ जुन २०२३ व १९ सप्टेंबर २०२३ रोजी मान्यता प्रदान करण्यात येउन त्यासंदर्भातील शासन निर्णय १४ जुलै २०२३ व १ नोव्हेंबर २०२३ रोजी निर्गमित करण्यात आले होते. त्याच वेळी अहिल्यानगर जिल्ह्यात सुयोग्य जागेचे कारण पुढे करून या महाविद्यालयास परवानगी देण्यात आली नव्हती. त्याविरोधात खा. लंके यांनी आवाज उठविल्यानंतर चौंडी येथील मंत्रीमंडळाच्या बैठकीत अहिल्यानगरच्या महाविद्यालयास मान्यता देण्यात आली.

## पंतप्रधानांचेही वेधले लक्ष !

सुयोग्य जागेचे कारण पुढे करून अहिल्यानगरच्या महाविद्यालयास परवानगी नाकारल्यानंतर खा. लंके यांनी या महाविद्यालयासाठी पाठपुरावा केला. थेट पंतप्रधानांपर्यंत कैफियत मांडण्यात आल्यानंतर राज्य मंत्रीमंडळाने महाविद्यालयाच्या उभारणीस मान्यता दिली. त्यानंतर हे महाविद्यालय नगर शहर सोडून शिर्डी येथे नेण्याचा घाट घातला गेला. ही बाब लक्षात आल्यानंतर खा. लंके यांनी त्यास प्रखर विरोध दर्शवत हे महाविद्यालय सर्व जिल्ह्याच्या हिताच्या दृष्टीने नगर शहराच्या १० ते १५ किलोमीटरच्या परिघातच उभारले जावे अशी आग्रही मागणी १९ मे रोजी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली होती.

## खा. लंके यांनी सुचवल्या 'या' उपलब्ध जागा

नगर शहराच्या परिघात सुयोग्य जागा नसल्याचे प्रशासनाकडून भासविले जात असल्याचे लक्षात येताच खा. निलेश लंके यांनी जिल्हाधिकाऱ्यांना पत्र देऊन नगर शहराच्या परिघात उपलब्ध असलेल्या जागांचा तपशील सादर केला आहे. त्यामध्ये आरणगांव ता. नगर, वडगांव गुप्ता ता. नगर, कांदा मार्केटजवळ, केडगांव, वाळुंज पारगांव ता. नगर, विळद ता. नगर, संभाजीनगर रस्त्यावरील इंद्रायणी हॉटेलजवळ, निंबळक ता. नगर, चास ता. नगर, पिंपळगांव माळवी ता. नगर, देहरे ता. नगर या जागांचा समावेश आहे.

